७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. २० जानेवारी २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०२७ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


## भारत-न्यूझीलंड टी-२० मालिकेचा बिगुल वाजला

पुणे (दै. संध्या) : भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील एकदिवसीय मालिकेतील थरार संपल्यानंतर आता टी-२० क्रिकेटचे वारे वाहू लागले आहेत. २१ जानेवारीपासून पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेला सुरुवात होत असून, पहिला सामना नागपूरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. टी-२० विश्वचषक २०२६ पूर्वीची ही शेवटची आंतरराष्ट्रीय मालिका असल्याने दोन्ही संघांसाठी ही 'अंतिम चाचणी' असणार आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील आतापर्यंतच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास टीम इंडियाचे वर्चस्व दिसून येते. दोन्ही संघांमध्ये आतापर्यंत २५ टी-२० सामने झाले आहेत, ज्यामध्ये भारताने १४ सामन्यांत विजय मिळवला आहे, तर न्यूझीलंडला १० सामन्यांत यश आले आहे. भारताच्या १४ विजयांपैकी दोन विजय 'सुपर ओव्हर'मधील आहेत. दोन्ही संघांमधील एक सामना टाय झाला आहे. न्यूझीलंडने २०१२ मध्ये भारताचा दौरा केला होता, तेव्हा त्यांनी १-० अशी मालिका जिंकून भारतीयांना धक्का दिला होता.

# गुंतवणूकीसाठी 'महाराष्ट्र' भारताचा गेट वे ऑफ इंडिया : मुख्यमंत्री

- राज्याच्या सर्व भागासाठी वैविध्यपूर्ण क्षेत्रात गुंतवणूक येणार
- दावोसमध्ये महाराष्ट्र पॅव्हेलियन सज्ज
- उद्योग, गुंतवणूकदारांसाठी आकर्षणाचे केंद्र

**झ्युरिक (दै. संध्या)**

'महाराष्ट्र विश्वासार्ह आहे. आम्ही जे सांगतो. ते करतो. त्यामुळेच जगभरातील उद्योजक, गुंतवणूकदारांचा महाराष्ट्रावर विश्वास वाढला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारत वाटचालीसाठी पार्श्वभूमी निर्माण केली आहे. एक ईकोसिस्टिम तयार केली आहे. त्याआधारे यंदाही महाराष्ट्रात प्रचंड प्रमाणात गुंतवणूक येईल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. 'महाराष्ट्र' हे भारतात येणाऱ्या गुंतवणुकीसाठी गेटवे ऑफ इंडिया आहे. त्यामुळे भारतातील अन्य राज्यांशी आमची चांगल्या अर्थाने स्पर्धा आहे. सरतेशेवटी देशासाठी ही बाब चांगलीच ठरते. पण यातही महाराष्ट्र पुढे आहे याचा अभिमान असल्याचेही त्यांनी सांगितले.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत प्रतिनिधीमंडळासमवेत दावोस येथे दाखल झाले आहेत. या दरम्यान त्यांनी महाराष्ट्र पॅव्हेलीयन मध्ये माध्यमांशी संवाद साधला.

महाराष्ट्रातील सर्व भौगोलिक क्षेत्रासाठी गुंतवणूक मिळवणार असून. त्यासाठी वैविध्यपूर्ण अशा दहा ते बारा क्षेत्रातील उद्योगांशी समन्वय साधला जात आहे. आता तिसरी मुंबई उभी राहते आहे. तिच्यासाठी मोठी गुंतवणूक मिळण्याचे संकेत आहेत. आमच्याकडे उत्तम मेन्यू कार्ड आहे . त्यामुळे गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यात यशस्वी होऊ, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमची वार्षिक बैठक ही उद्योग, गुंतवणूकदारासाठी एक प्रकारे चावडी आहे. याठिकाणी दरवर्षी आम्ही महाराष्ट्राकडे काय आहे, कोणती क्षमता आहे, हे शोकेस करण्यासाठी येत असतो. यंदाही गतवर्षीच्या तुलनेत आणखी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येईल असा विश्वास आहे. कारण देशात अशा प्रकारे येणारी गुंतवणूक व त्याबाबतचे करार करण्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे. अशाप्रकारे सुमारे ६० ते ६५ करार प्रत्यक्षात आणण्यात महाराष्ट्राला यश मिळाले आहे. दावोस परिसर निसर्गसौंदर्याने नटलेला आहेच. इथे उद्योगजगत एकत्र येतो. महाराष्ट्रातून आलेल्या उद्योजकांनी या मंचाचा पुरेपूर उपयोग करावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

दरम्यान, सकाळ मीडिया ग्रुपच्या ग्लोबल इंम्पॅक्ट फोरमवर मुख्यमंत्री फडणवीस यांची प्रकट मुलाखत झाली. त्यावेळी ते म्हणाले, गेल्या दशकात महाराष्ट्राने सरासरी १० टक्क्यांहून अधिक विकासदर कायम राखला असून, राज्य




२०३२ पर्यंत देशातील पहिले ट्रिलियन डॉलर्सची असणारी अर्थव्यवस्था बनू शकते. मात्र, हा टप्पा आणखी वेगाने २०३० पर्यंत गाठण्याचे उद्दिष्ट आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सध्याची जागतिक भू-राजकीय परिस्थिती आव्हानात्मक असली, तरी आंतरराष्ट्रीय संस्थांच्या अंदाजानुसार भारत हा जागतिक अर्थव्यवस्थेतील 'ब्राइट स्पॉट' आहे. जगभरातील विकासदर मंदावले असताना, महाराष्ट्र मात्र आपला विकासदर टिकवून ठेवण्यात यशस्वी ठरत आहे आणि राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक येत आहे.

गेल्या वर्षी भारतात आलेल्या एकूण थेट परकीय गुंतवणुकीपैकी 39 टक्के 'एफडीआय' महाराष्ट्रात आला आहे. त्यामुळे गुंतवणुकीच्या बाबतीत महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. राज्य शासनाने आतापर्यंत 15 ते 16 धोरणे लागू केली असून, या धोरणांमुळे गुंतवणूकदारांसाठी सक्षम आणि विश्वासार्ह इकोसिस्टीम तयार झाली आहे.

आज महाराष्ट्रात गुंतवणुकीची कमतरता नाही आणि यासाठी योग्य ते वातावरण महाराष्ट्रात तयार झाले आहे, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) हे अर्थव्यवस्थेचा कणा असून रोजगारनिर्मितीत त्यांचा सर्वाधिक वाटा आहे. केंद्र व राज्य सरकार 'एमएसएमई'ना प्रोत्साहन देत आहे. केवळ भांडवल नव्हे, तर आजच्या काळात विश्वासार्हता हा सर्वात मोठा घटक आहे.

गेल्या वर्षी महाराष्ट्रात तब्बल 16 लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले. यात प्रत्यक्ष गुंतवणुकीत रूपांतरित व्हावेत यासाठी राज्याने स्वतंत्र ट्रॅकिंग यंत्रणा उभारली आहे. देशपातळीवर जिथे सामंजस्य करारांचे रूपांतरण प्रमाण साधारणतः 25 ते 30 टक्के असते, तिथे महाराष्ट्रात हे प्रमाण 50 ते 55 टक्के असून, दावोस करारांच्या बाबतीत 75 ते 80 टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. जमीन वाटप, मंजुरी प्रक्रिया, तसेच 'वॉर रूम'च्या माध्यमातून प्रत्येक गुंतवणूकदाराला उद्योग क्षेत्राशी जोडून ठेवण्यात येत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## ढिंग-टांग




## शिवसेना आणि धनुष्यबाण कुणाचा?

- सर्वोच्च न्यायालयात बुधवारी अंतिम सुनावणी
- राष्ट्रवादी काँग्रेसच्या 'घड्याळ'बाबतही होणार फैसला

**मुंबई (दै. संध्या)**

महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचा आणि दोन महत्त्वाच्या प्रादेशिक पक्षांच्या भवितव्याचा पेच आता सर्वोच्च न्यायालयात सुटण्याच्या मार्गावर आहे. शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' या निवडणूक चिन्हाबाबत येत्या बुधवारपासून (२१ जानेवारी) अंतिम सुनावणीला सुरुवात होत आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठ सलग दोन दिवस या प्रकरणाचा युक्तिवाद ऐकून घेणार असून, राज्याच्या राजकारणाला कलाटणी देणारा निकाल लवकरच जाहीर होण्याची चिन्हे आहेत. याशिवाय राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि घड्याळ चिन्हावर देखील सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडणार आहे. विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 2022 मध्ये तत्कालीन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याविरोधात उघड बंड केले होते. त्यांनी आपल्या समर्थक आमदारांसह प्रथम गुजरात व तेथून गुवाहाटीला प्रयान केले होते. शिंदे यांनी नंतर आपल्या समर्थक आमदार व खासदारांच्या संख्याबळाच्या आधारावर शिवसेना पक्ष व चिन्हावर दावा सांगितला होता. त्यासंबंधीचा कायदेशीर लढा केंद्रीय निवडणूक आयोगापुढे झाला. त्यात आयोगाने संख्याबळाच्या आधारावर शिवसेना पक्ष व चिन्ह हे उद्धव ठाकरे यांच्याकडून काढून शिंदे यांच्या गटाला दिले.

## शिवसेनेचा महापौर व्हावा ही कार्यकर्त्यांची भावना - एकनाथ शिंदे

**मुंबई (दै. संध्या)**

मुंबई महापालिकेच्या महापौर पदावरून सध्या शिवसेना शिंदे गट आणि भाजपमध्ये चर्चा सुरू आहे. यावर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया देत मुंबईत महायुतीचाच महापौर होणार असल्याचे म्हटले आहे. महापालिका निवडणुकीत मुंबईकरांनी महायुतीला पसंती दिली आहे, आम्ही जनमताचा आदर करणार. विरोधकांकडून अफवा पसरवण्यात येत असून त्यावर कोणीही विश्वास ठेवू नये, असे शिंदे म्हणाले. तसेच बाळासाहेबांच्या जन्मशताब्दीच्या वर्षी मुंबईचा महापौर हा शिवसेनेचा असावा ही कार्यकर्त्यांची भावना असू शकते, असेही शिंदे म्हणाले. एकनाथ शिंदे म्हणाले, 2019 साली जनमताचा अनादर करत ठाकरेंनी वेगळी सत्ता स्थापन केली. तसे आम्ही करणार नाही. आम्ही जनमताचा आदर करतो. बाळासाहेबांचा आशीर्वाद, नरेंद्र मोदींच्या मार्गदर्शनाखाली या निवडणुका लढल्या गेल्या. त्यानुसार ज्या ज्या ठिकाणी आम्ही महायुतीत लढलो त्या त्या ठिकाणी महायुतीचा महापौर निवडून येणार. तर ठाण्यात अडीच वर्षांच्या महापौरपदाची चर्चा सुरू असल्याचे चर्चा आहे, यावर बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, या विरोधकांनी पसरवलेल्या अफवा आहेत. आमची लढाई ही सत्ता खुर्चीसाठी नाही, आमची लढाई ही मुंबईच्या विकासासाठी आहे. मुंबईकरांना आम्ही काय देणार आहोत यावर आम्ही लक्ष दिले असल्याचे शिंदे म्हणाले.



तसेच नवनियुक्त नगरसेवकांना हॉटेलमध्ये ठेवण्यात आले आहे, यावर प्रश्न विचारला असता एकनाथ शिंदे म्हणाले, आमच्या पक्षाची बैठक घेतली, नव्याने निवडून आल्यानंतर त्यांना मार्गदर्शन केले. पुढच्या पाच वर्षात त्यांनी काय काम करायचे याबद्दल त्यांना मार्गदर्शन करण्यात आल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, शिवसेना शिंदे गटाचे सर्व नगरसेवक हे मुंबईतील पंचतारांकित हॉटेलमध्ये मुक्कामी आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा हॉटेल पॉलिटिक्सला सुरुवात झाल्याचे पाहायला मिळत आहे. या नगरसेवकांचा महापालिकेतील 'गट' तातडीने स्थापन केला जाणार असून याबाबतची कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करून गट नेत्यांची निवड केली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे.

## ब्रेकिंग न्यूज

### 'लाडकी बहीण' योजनेचा हप्ता रखडला

मुंबई (दै. संध्या) : राज्यात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा डिसेंबर महिन्याचा हप्ता मकरसंक्रांतीच्या मुहूर्तावर जमा झाला. मात्र, ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करूनही अद्याप अनेक महिलांच्या बँक खात्यात पैसे जमा न झाल्याने संभ्रमाचे वातावरण आहे. केवळ ई-केवायसीच नाही, तर उत्पन्नाच्या निकषात न बसल्यामुळे अनेक महिलांचे पैसे रोखले गेल्याची बाब आता समोर आली आहे. योजनेच्या सुरुवातीला अनेक महिलांनी अपात्र असतानाही लाभ घेतला असल्याचे निदर्शनास आले होते. हे रोखण्यासाठी सरकारने ३१ डिसेंबरपर्यंत ई-केवायसी करणे बंधनकारक केले होते. ज्या महिलांची ई-केवायसी पूर्ण आहे आणि ज्या पात्रतेच्या सर्व निकषांत बसतात, त्यांनाच डिसेंबरचा हप्ता वितरित करण्यात आला आहे. मात्र, ज्यांचे वार्षिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, अशा महिलांना ई-केवायसी असूनही अपात्र ठरवण्यात आले आहे.

### २५०० कलाकार करणार सादरीकरण

नवी दिल्ली (दै. संध्या) : देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनासाठी राजधानी दिल्लीतील कर्तव्यपथ सज्ज झाला असून यंदाचा सोहळा सांस्कृतिक दृष्टिकोनातून अत्यंत खास असणार आहे. 'वंदे मातरम' या राष्ट्रगीताच्या १५० व्या वर्षपूर्तीचे औचित्य साधून यंदाच्या संचलनात भारतीय संस्कृतीचे भव्य दर्शन घडणार आहे. या विशेष सोहळ्यात देशभरातील विविध प्रांतांतून आलेले सुमारे २,५०० कलाकार आपली कला सादर करणार असून 'स्वतंत्रतेचा मंत्र – वंदे मातरम' आणि 'समृद्धीचा मंत्र – विकसित भारत' ही यंदाच्या परेडची मुख्य संकल्पना निश्चित करण्यात आली आहे.

## बाबा सिद्दिकी सारखीच तुमची हत्या करू

### नवनीत राणा यांना जीवे मारण्याची धमकी, पोलिसांत अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल

**अमरावती (दै. संध्या)**

भाजप नेत्या व माजी खासदार नवनीत राणा यांना पुन्हा एकदा जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. पोलिसांच्या 112 क्रमांकावर फोन करत बाबा सिद्दिकी सारखीच नवनीत राणा यांची हत्या करू, अशी धमकी देण्यात आली आहे. या प्रकारामुळे एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या पूर्वी देखील नवनीत राणा यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. हिंदू शेरणी आणि निवडणूक प्रचारादरम्यान हैदराबाद येथील भाषणानंतर नवनीत राणा यांना धमकी देण्यात आली होती. आता पुन्हा एकदा त्यांना फोनवरून धमकी देण्यात आल्याने अमरावती जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. धमकी प्रकरणी नवनीत राणा यांचे खासगी स्वीय सहाय्यक सचिन सोनोने यांनी राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. यानुसार पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू केला आहे. नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकीत अमरावतीमध्ये भाजप आणि आमदार रवी राणा यांच्या पक्षाला मोठे यश मिळाले आहे. परंतु, या निवडणुकीत एमआयएम खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी नवनीत राणा यांच्यावर केलेली टीका चांगलीच चर्चेत आली. मुले जन्माला घालण्याच्या संदर्भात नवनीत राणा यांनी वक्तव्य केले होते. तोच मुद्दा पकडत ओवेसी यांनी नवनीत राणा यांना डिवचले होते. त्यानंतर, आता पोलिसांना फोन करून नवनीत राणा यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची घटना घडली आहे.



## मुंबईत बिहार भवन होऊ देणार नाही : राज ठाकरेंच्या नगरसेवकाने थोपटले दंड

**मुंबई (दै. संध्या)**

यंदाच्या मुंबई महापालिका निवडणुकीत 'मराठी अस्मिता' आणि 'परप्रांतीय' हे मुद्दे केंद्रस्थानी राहिल्याने संपूर्ण राज्याचे लक्ष या लढतीकडे लागले होते. ठाकरे बंधू एकत्र आल्याने मराठी मतांच्या ध्रुवीकरणासाठी प्रयत्न झाले, तर राज ठाकरे यांनी मुंबई गुजरातला नेण्याच्या शक्यतेवरून आक्रमक भूमिका घेत जोरदार प्रचार केला होता. मात्र, मराठी माणूस विरुद्ध परप्रांतीय अशा रंगलेल्या या अटीतटीच्या सामन्यात ठाकरे बंधूंना मुंबईची सत्ता राखण्यात अपयश आले. भारतीय जनता पक्ष सर्वाधिक जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला असून, त्यांच्या नेतृत्वाखालील महायुतीने महापालिकेत स्पष्ट बहुमत मिळवत आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. एकीकडे भाजपने मुंबईत विजय मिळवलेला असतानाच, आता बिहारमधील नितीश कुमार सरकारने मुंबईत 'बिहार भवन' उभारण्याची घोषणा केल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या प्रस्तावावर अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला असून, मुंबईत बिहार भवन कोणत्याही परिस्थितीत होऊ देणार नाही, असा इशारा मनसेच्या नवनिर्वाचित नगरसेवका यशवंत किल्लेदार यांनी दिला आहे.



# मुंबई महापालिकेत ठाकरेंचाच महापौर होणार?

### आरक्षण सोडतीत योग्य पत्ते पडले, तर कारभारी होण्याची पुन्हा संधी मिळणार; २ हुकमी एक्के खिशात



**मुंबई (दै. संध्या)**

महापौर पदाच्या आरक्षण सोडतीत योग्य पत्ते पडले तर मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचाच उमेदवार महापौर होईल असा नवा दावा केला जात आहेत. या प्रकरणी कोणत्याही पक्षाकडे नाहीत असे दोन हुकमी एक्के ठाकरे गटाकडे आहेत. त्यामुळे या चर्चेला ऊत आला आहे. उद्धव ठाकरे यांनी 2 दिवसांपूर्वीच देवाची इच्छा असेल तर आपलाच महापौर होईल हे विधान केले होते हे विशेष. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत भाजपला सर्वाधिक 89 जागा मिळाल्या आहेत. तर ठाकरे बंधूंना 71 जागा मिळाल्या आहेत. सत्ताधारी शिवसेना 29 जागा जिंकत थेट तिसऱ्या क्रमांकावर फेकल्या गेली आहे. आता निवडणुकीनंतर फोडाफोडी होण्याच्या भीतीने एकनाथ शिंदेंनी शिवसेनेच्या सर्व नगरसेवकांना मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलात हलवले आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईत उद्धव ठाकरेंचाच महापौर होण्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. येत्या 22 जानेवारीला महापौर पदाच्या आरक्षणाची सोडत जाहीर होणार आहे. त्यात कोणत्या प्रवर्गाचा महापौर मुंबईच्या खुर्चीत विराजमान होणार? हे स्पष्ट होणार आहे. निवडणुकीपूर्वी नगरसेवकांसाठी जाहीर झालेल्या आरक्षणामध्ये 2 जागा अनुसूचित जमाती अर्थात एसटी प्रवर्गासाठी राखीव आहेत. त्यानुसार 53 व 121 हे 2 प्रभाग अनुसूचित जमातीसाठी राखीव ठेवण्यात आले होते. या दोन्ही प्रभागांत सर्वच पक्षांनी उमेदवार दिले. पण दोन्ही ठिकाणी उद्धव ठाकरे यांच्याच शिवसेनेचे उमेदवार विजयी झाले. त्यामुळे आरक्षण सोडतीत महापौर पद एसटीला सुटले तर त्यावर ठाकरे गटाचा उमेदवार बसेल हे निश्चित आहे.

महापालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक 53 व प्रभाग क्रांक 121 हे दोन प्रभाग अनुसूचित जमातीसाठी राखीव होते. त्यात प्रभाग क्रमांक 53 मधून ठाकरे गटाच्या जितेंद्र वळवी यांनी शिंदे गटाच्या अशोक खांडवे यांचा पराभव केला. प्रभाग क्रमांक 121 मध्येही ठाकरे गटाच्याच प्रियदर्शनी ठाकरे यांचा विजय झाला.

# संपादकीय

## ‘देवा’ भाऊंच्या मनात...

देशातील सर्वात मोठी महापालिका असा लौकीक असलेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीत यंदा ठाकरेंच्या सत्तेला सुरुंग लागला. भाजप महायुतीचा महापौर बसेल हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही. 'देवा'भाऊंच्या मनात असेल तोच महापौर होईल. अशी राजकीय वर्तुळातील चर्चा आहे. महाराष्ट्रातील २९ महानगरपालिका निवडणुकींचा निकाल दोन दिवसांपूर्वी जाहीर झाला. पुन्हा एकदा भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला. एवढंच नव्हे तर महापालिकांच्या एकूण २८६९ प्रभागांतून भाजपचे १४२५ नगरसेवक निवडून आले. भाजपच्या विजयी नगरसेवकांचा आकडा सर्वाधिक आहे. त्या खालोखाल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला यश मिळाले. त्यांचे ३३९ नगरसेवक निवडून आले. तिसऱ्या क्रमांकावर काँग्रेस असून, त्यांची संख्या ३३४ आहे. राज्यात महायुतीत सत्तेत असलेल्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीने अनेक ठिकाणी भाजपला आव्हान देण्याचा प्रयत्न केला. पुणे-चिंचवड महापालिकेत विरोधकांशी हातमिळवणी केली. त्यातून त्यांना १६७ नगरसेवकांना निवडून आणण्यात यश लाभले. या महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडी म्हणून लढताना अपवादात्मक स्थितीत पाहायला मिळाले. महायुतीतील भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी या तीन पक्षांचा राज्यात बोलबाला होता. याआधी झालेल्या नगर परिषद, नगर पंचायतीच्या निवडणुकीतही विरोधक लढताना कुठे दिसले नाहीत. त्यामुळे सत्ताधारी पक्षांचे जे उमेदवार बिनविरोध निवडून आले, त्यांच्यावर टीका करत, रडीचा डाव खेळण्याचा प्रयत्न विरोधकांनी केला. महापालिका निवडणुकीत निवडून आलेल्या ६६ उमेदवारांच्या निकालाला स्थगिती द्यावी यासाठी विरोधकांकडून उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठवण्यात आले; परंतु त्यांच्या याचिका फेटाळून लावल्या. सत्ताधाऱ्यांपुढे आपली डाळ शिजणार नाही म्हणून निवडणुकीच्या आधीपासून निवडणूक आयोगापुढे प्रश्नचिन्ह उभे करून त्यांच्यावर संशयाच्या नजरेतून आरोप केले; परंतु निकालाची प्रक्रिया पार पडताना, राज्यभरात कुठेही राज्य निवडणूक आयोगाला आरोपींच्या पिंजऱ्यात पकडता यावे, अशी संधी विरोधकांना मिळाली नाही. देशातील सर्वात मोठी महापालिका असा लौकीक असलेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीत यंदा ठाकरेंच्या सत्तेला सुरुंग लागला. भाजप महायुतीचा महापौर बसेल हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही. २२७ सदस्य संख्या असलेल्या मुंबई महापालिकेत भाजपचे सर्वाधिक ८९ नगरसेवक निवडून आले आहेत. शिंदे यांच्या शिवसेनेच्या २९ नगरसेवकांची जोड मिळाल्याने बहुमताचा ११४ चा जादुई आकडा महायुतीने पार केला आहे. महाराष्ट्रातील अन्य महापालिकेत सत्ता मिळो ना मिळो, पण मुंबई महापालिकेत कोणत्याही परिस्थितीत सत्ता हवीच, यासाठी उबाठाने रणनीती आखली होती. मराठी अस्मिता, मराठी माणूस या मुद्यांवर भावनिक साद घालत २० वर्षांपासून अलिप्त राहिलेले ठाकरे बंधू एकत्र आले होते. सोन्याची अंडी देणारी कोंबडी म्हणून उल्लेख केला जातो, ती मुंबई महापालिका ठाकरे बंधूंच्या हातातून निसटली. २५ वर्षे मुंबई महापालिकेत सत्तेवर असताना, मराठी माणसाचे हित पाहिले असते, तर मराठी माणूस मुंबईबाहेर हद्दपार झाला नसता, याचे आत्मचिंतन करण्याची वेळ ठाकरे बंधूंवर आली आहे. मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी होणार? मुंबई उद्योगपतींच्या घशात घालण्याचा कट? असा विखारी प्रचार ठाकरे बंधूंकडून करण्यात आल्यानंतर त्याचा काहीही उपयोग झाला नाही. मुंबई महापालिकेत सर्वपक्षीय १४७ मराठी भाषिक नगरसेवक निवडून आले आहेत. त्यात भाजपच्या ८९ पैकी ५६ नगरसेवकांचा समावेश आहे. महायुती सत्तेवर आली, तर हिंदू मराठी महापौर बसेल अशी स्पष्ट भूमिका भाजपने निवडणूक प्रचारात जाहीर केली होती. मराठी-अमराठी असा भेद न करता केवळ मुंबईच्या विकासाचे 'व्हिजन' घेऊन महायुतीने प्रचार केला होता. कोस्टल रोड, मेट्रोसारख्या प्रकल्पाचे केलेले काम जनतेपुढे ठेवल्याने मुंबईतील जेनझी (तरुण) हा महायुतीच्या पाठिशी उभा राहिला हे निकालातून स्पष्ट झाले. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा गद्दार असा उल्लेख करत त्यांना हिणवण्याचा वारंवार प्रयत्न केला.

## संस्कृत सुभाषित

अनाहूत: प्रविशती अपृष्टो बहु भाषते–
अविश्वस्ते विश्वसिति मूढचेता नराधम:।।
(उद्योगपर्व, अध्याय ३३, ४१, महाभारत)

## गुरु वचन

### जीवनाचे सार – चार गोष्टी

जगातल्या प्रत्येक अडचणीची उकल शक्य आहे. मानव तर विशेष शक्तींचा धनी आहे. जर मानवाकडे सातत्य, निष्ठा व प्रयत्न करण्याची क्षमता असेल तर त्यासाठी सर्व सोपे आहे. जीवनाला निरुपयोगातून उपयोगी बनवण्यासाठी अनेक उपाय आहेत. त्यापैकी चार गोष्टी अशा आहेत, ज्यांचा जीवनात समावेश केल्याने अडचणींचे समाधान होऊ शकते. या चार गोष्टींना जीवनाचे सार किंवा आधार सुद्धा म्हटले जाऊ शकते. सर्व प्रकारच्या विकारांचा त्याग, मिथ्यत्व सोडून साधेपणा ग्रहण करणे आहे, बंधने झुगारुन साहस व जीवनात अध्यात्माचा समावेश केला तर मनुष्याचे निरुपयोगी जीवन उपयोगी बनेल. त्याच्या जीवनात असंतोषाचा नाश होईल. त्याबदल्यात त्याच्या जीवनात आनंद, उत्साह, शांतता व समाधानाची वृद्धी होईल.

विकार मानवी जीवनातील सर्वात मोठा अडसर आहे. जो मानवास फक्त विकृती देतो तसेच उदारता, दान, दया, प्रेम या प्रवृत्तींना वंचित करतो. म्हणून त्याच्या भौतिक इच्छा इतक्या बळावतात की, संग्रह करणे मग ते योग्य–अयोग्य, कर्तव्य–अकर्तव्य, नातेवाईक–त्रयस्त, शोषण–पोषण याचा अजिबात विचार करत नाही. आपला फायदा व मोहासमोर त्यास सर्व आदर्श, मर्यादा व धोरणे क्षुल्लक वाटू लागतात. अशाप्रकारे विकारांनी पिडीत मनुष्याच्या जीवनात शोक–संताप व अशांतता, असंतोषाशिवाय कुणाला आनंदाची संधी मिळू शकते? विकृती मनुष्याचा फार मोठा दोष आहे, याचा तात्काळ त्याग केला पाहिजे. उदारता व महानतेची वृत्ती मनुष्याचे दोन दागिने मानले गेले आहेत. उदारतेचा गुण आपल्यातील इतर गुण त्यागण्यास प्रोत्साहित करतो. त्याग तपश्चर्ये पेक्षा कमी नसतो. त्यागी पुरुष कुठल्याही वस्तुचा संग्रह धोरण व आदर्शा व्यतिरिक्त करत नाही. उदारता पुरुष मोक्षासाठी अंगीकारतो. उदार पुरुष धोरणाने मिळवलेल्या धन–धान्याने सुखी व समाधानी राहतो. अशा लोकांची प्रत्येक अडचण आपोआप सुटत राहते.

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. ८३९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 5 | | 7 | 9 | 6 | 8 | |
| 8 | | 7 | | 1 | 5 | | | |
| | 9 | | | | 8 | | | |
| 6 | 4 | 2 | | 8 | | | 9 | 1 |
| | | | | | | | | |
| 1 | 8 | | | 6 | | 5 | 2 | 4 |
| | | | 7 | | | | 1 | |
| | | | 4 | 5 | | 2 | | 7 |
| | 6 | 1 | 8 | 9 | | 4 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ८३८ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 5 | 6 | 2 | 1 | 7 | 8 | 3 | 4 |
| 8 | 1 | 4 | 9 | 5 | 3 | 6 | 7 | 2 |
| 7 | 3 | 2 | 6 | 4 | 8 | 9 | 5 | 1 |
| 2 | 7 | 8 | 3 | 9 | 4 | 5 | 1 | 6 |
| 1 | 4 | 3 | 5 | 6 | 2 | 7 | 9 | 8 |
| 6 | 9 | 5 | 8 | 7 | 1 | 4 | 2 | 3 |
| 4 | 6 | 9 | 1 | 3 | 5 | 2 | 8 | 7 |
| 3 | 8 | 7 | 4 | 2 | 9 | 1 | 6 | 5 |
| 5 | 2 | 1 | 7 | 8 | 6 | 3 | 4 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १३२० – व्हलादिस्लॉ लोकिटेक पोलंडच्या राजेपदी.
- १८०१ – जॉन मार्शल अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी.
- १८३९ – युंगेची लढई – चिली कडून पेरू व बॉलिव्हियाचा पराभव.

### राष्ट्रीय

- २००७– ओएनजीसीचा रशियाच्या टीजीटी कंपनीशी करार.
- २००८ – आशियातील सर्वात मोठी मॅरॅथॉन स्पर्धा असलेल्या, स्टँडर्ड चार्टर्ड मुंबई मॅरॅथॉनमध्ये आपले वर्चस्व कायम राखत केनियाच्या जॉन कॅलॉयने सलग दुसऱ्यावर्षी ४२ किलोमीटरची फुल मॅरॅथॉन स्पर्धा जिंकली.


### जन्म

- २२५ – गोर्डियन तिसरा, रोमन सम्राट यांचे जन्म.
- १४३५ – अशिकागा योशिमासा, जपानी शोगन यांचे जन्म.
- १५५४ – सेबास्टियन, पोर्तुगालचा राजा यांचे जन्म.
- १७१६ – चार्ल्स तिसरा, स्पेनचा राजा यांचे जन्म.
- १७९८ – ॲन्सन जोन्स, टेक्सासच्या प्रजासत्ताकचा पाचवा व शेवटचा अध्यक्ष यांचे जन्म.
- १८९६ – जॉर्ज बर्न्स, अमेरिकन अभिनेता यांचे जन्म.

### निधन

- १६१२ – रुडोल्फ दुसरा, पवित्र रोमन सम्राट यांचे निधन.
- १६६६ – ऑस्ट्रियाची ॲना, फ्रांसचा राजा लुई तेरावा याची पत्नीचे निधन.
- १७४५ – चार्ल्स सातवा, पवित्र रोमन सम्राट यांचे निधन.
- १८१९ – चार्ल्स चौथा, स्पेनचा राजा यांचे निधन.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. ८३९



**आडवे शब्द**

१. रात्रीच्या रात्री
४. फोटो
६. राष्ट्रगीताची सुरुवात
११. शंभर पैसे
१३. बाजेची कापडी पट्टी
१४. सोन्याचा धागा
१५. वाईट
१७. हमाल
१९. निबर, एक इंग्रजी महिना
२१. अडत्या
२३. खर्चच्या विरूद्ध
२५. पोवाडे म्हणणारा
२७. फांदी तुटतानाचा आवाज
२९. नाणी पारखणारा, दत्तो वामन यांचे आडनाव
३१. रोख
३२. नरकासुराचे प्रतीक म्हणून फोडले जाणारे फळ
३४. मालक
३५. हे जसे–फळ तसेच!
३६. पाळता येईल असा प्राणी
३८. कोष्टी, कापड विणणारा
४०. दिल्लीचे विमानतळ
४२. छोटा, लहान
४३. सैन्य
४४. कवडीमोल
४६. शहर
४८. मुलगा, पुत्र
५१. जुळे
५२. उगीच
५४. 'सबसे तेज' वृत्तवाहिनी
५६. शेतकरी (हिंदी)
५८. गाजावाजा
५१. पळून जाणे
६०. मोठी गंमत
६१. रंग बदलणारे फूल
६२. नम्र, वाकलेला
६४. एक आंबट–गोड फळ
६५. खूप
६६. चालू दिवस
६७. ओघ, पाण्याचे वाहणे
६९. थडगे
७१. फटाक्याची माळ
७२. नारळ वाढवण्याची प्रथा या कुप्रथेऐवजी प्रचलित झाली
७४. मृत्यूदेवता
७५. जनक राजाची मुलगी
७८. झडती (हिंदी)
७९. एकूण एक, सर्व
८०. फेटाळणे
८१. लक्ष्मी

**उभे शब्द**

१. अडखळत बोलणारा
३. झाड, वृक्ष
४. सावली
५. पुष्कळ
६. आई–वडील
७. नवीन
८. नडलेला अडलेला
९. मला
१०. श्रेष्ठ पुरुष
१२. पैंजण
१५. पाषण
१६. पाणकोंबडा
१७. हिंदुस्थान
१८. राबता, ये–जा
२०. धुंदी, कैफ
२२. आवडता, प्रिय
२४. कापड विणण्याचे साधन
२६. साठावा वाढदिवस
२८. कोवळी फांदी
२९. चाळीस शेर
३०. पोते शिवण्याची सुई
३३. जाड दोर
३४. पृथ्वी
३६. हालचालीवर ठेवलेली नजर
३७. वर्तुळ
३८. गणपती
३९. कमीत कमी व जास्तीत जास्त
४०. अधिक प्रमाणात लोह असणारी पालेभाजी
४१. दुसऱ्याचे विचार जाणणारा
४५. श्रीकृष्णाचे एक नाव
४७. रविवार
४९. दृष्टीभेट
५०. प्रकाश, कांती
५३. मूळ अर्थ सुंदर, शहाणा प्रचलित अर्थ शहरी
५४. देवाण–घेवाण
५५. रेलण्याची उशी
५७. प्रामाणिक
६०. श्रीमंत
६१. दाहक आम्ल (हिंदी)
६३. ग्रामीण बोलीत तेव्हा
६५. लाभदायक
६६. आजूबाजूला
६८. अंकित माणूस, हेर
६९. लावणीतील पास असे असते!
७०. प्रजा
७३. मांडणी
७४अ. मज
७५. एक मिश्र धातू
७६. ओटा, पार
७७. न्यायाने वागणारा

**जम्बो शब्दकोडे क्र. ८३८ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.प्रवासी ३.जालशय ७.ठाण मांडणे ११.नजर मरणे १२.जर १३.साग १४.समूह १६.नीरा १७.कबर १८.अमर १९.कदर २०.सकवार २१.सहाण २४.माजघर २६.जत्रा २७.ना हरकत प्रमाणपत्र ३१.नेता ३२.संघर्ष ३३.जागा ३५.तरतरीत ३७.नरवर ३९.तरट ४२.मळा ४४.वस्त ४६.ठकविणे ४८.टवकारणे ५०.रसद ५२.उणे ५३.शारदा ५६.वळ ५७.पल ५८.दमट ६०.परत परत ६३.विकार ६४.पराग ६५.मासा ६७.वाचा ६९.तनय ७०.कडकडाट ७१.अनाकलनीय ७३.दावा ७५.भाट ७६.रीस ७७.जनन मरण ७८.कोट

उभे उत्तर : १.प्रशंसक २.सीताहरण ३.जननी ४.लाजरा ५.शर ६.यमलोक ७.ठाणेकर ८.मांजर ९.डर १०.आगरकर १३.साम १५.मूद १८.अनुज २०.सणक २१.सह २२.हारजीत २३.ऋण २४.मात्र २५.घरघर २६.जन्मजात २७.नाताळ २८.तळतळात २९.माहूत ३०.पवन ३२.संवत्सर ३४.गारठणे ३६.रम ३८.रव ४०.टक ४१.कणेर ४३.वरवर ४५.वादळ ४७.विशाल ४९.वजा ५१.सवत ५२.उतावीळ ५४.दादरा ५५.कूप ५७.परवाना ५९.मग ६०.पसायदान ६१.तडक ६२.रजक ६५.मान ६६.वटवट ६८.चाकरी ७१.अट ७२.लस ७४.वाम

## उपदेशकथा

### तन्मयता

परलोकवासी प्रसिद्ध चित्रकार आबालाल रहमान यांची ही गोष्ट. रंगांच्या दुनियेत दंग झालेला हा कलावंत बाजारात गेला नि घेऊन आला दोन रसरशीत कृष्णाकाठची वांगी, तजेलदार भोपळी मिरच्या, शताक्ष सीताफळ नि हिरवीगार कोथिंबीर जुडी. त्यावेळी गोविंदराव टेंब्यांनी विचारलं, ‘काय, बाजार आटोपला वाटतं?’ चित्रकार उत्तरले, ‘अहो, ही भाजी नव्हे चित्रं आहेत. ही वांगी बेटी फार त्रास देणार बघा. वा, वा काय पण रंग आहे.’ टेंबे म्हणाले, ‘वांगी खाल्ली तरीही त्रास देतातच !’ आबालाल यावर उत्तरले, ‘अरे, खुदानं वांगी निर्माण केली ती मुळी चित्र बहारीनं रंगवता यावं म्हणून ! खाण्यासाठी नव्हे.’ इतके ते सृष्टीतील रंगवृष्टीशी तन्मय झालेले अवलिया चित्रकार होते.

कथा उपदेश : प्रतिभावंत चित्रकार मायकेल एंजेलोने म्हटले आहे की, ज्याला चित्रकार व्हायचं त्याला अवतीभवती सर्वत्र चित्रं दिसली पाहिजेत. जमिनीवर, झाडाझुडपांवर, आभाळात सगळीकडे निसर्गाची तुलिका अजब रेखाटनं करीत असते.

## : SMS :

Rich man: Aaj mere pas 14 cars,18 bikes,4bunglow,3 farmhouse hai, TUMARE paas kya hai...
POOR man: Mere Pass Beta hai,.. Jiski Girlfrnd.. Teri Beti Hai..

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २७.९ | १४ |
| अहमदनगर | २८ | १३.८ |
| अकोला | २९ | १२.७ |
| अमरावती | २८.३ | ११.८ |
| बीड | २८.६ | १२.१ |
| भंडारा | २७.२ | ११.५ |
| बुलढाणा | १६.४ | ५.५ |
| चंद्रपूर | २८.८ | १४.३ |
| चेन्नई | ३१ | २२.२ |
| नवी दिल्ली | १८.१ | ५.६ |
| धुळे | २९.६ | १४ |
| गोंदिया | २६.३ | १२.२ |
| जळगाव | २९ | ९ |
| कोल्हापूर | २९.२ | १५.३ |
| लातूर | २८.९ | १५.९ |
| मुंबई | २९ | २१.२ |
| नागपूर | २७.२ | १२.७ |
| नांदेड | २९.६ | १६.८ |
| नंदूरबार | २८ | १५.३ |
| नाशिक | २९.६ | १२.१ |
| पुणे | २८ | १३.८ |
| पंढरपूर | ३०.३ | १७.८ |
| सातारा | २९.१ | ११.१ |
| सांगली | ३०.२ | १६ |
| सोलापूर | ३०.६ | १८.३ |
| वर्धा | २८.४ | ११.८ |

## आजचे राशिभविष्य



**मेष :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:पश्चिम स्वत:चे मोठेपण व्यवहाराच्या आड येऊ देऊ नका.

**तुळ :** शुभ रंग :हिरवा, शुभ दिशा: उत्तर राहत्या घराचे प्रश्न मात्र लांबणीवर टाकणेच उत्तम. कटकटी कौशल्याने टाळा.

**वृषभ :** शुभ रंग: पांढरा., शुभ दिशा: उत्तर कठीण प्रसंगात अत्यंत उपयुक्त ठरणारे घरातील वृद्ध व वरिष्ठ यांना दुर्लक्षित करू नका.

**वृश्चिक :** शुभ रंग: काळा, शुभ दिशा: दक्षिण पैशाची अडचण दूर होईल. शेजाऱ्यापाजाऱ्यांचा त्रास कमी होईल.

**मिथुन :** शुभ रंग: गुलाबी: शुभ दिशा: दक्षिण निष्कारण निराशेचे विचार कामासाठीचा वेळ वाढविणारे व वेग कमी करणारे ठरतील.

**धनु :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पश्चिम राजकारणी, पुढारी, गल्लीतले दादा यांचा थोडाफार त्रास आपल्यापर्यंत येणे शक्य.

**कर्क :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: दक्षिण कलहाचे प्रसंग, होणाऱ्या चुका, वाहनांचा ताबा व बोलण्यातील तोल यावरचे नियंत्रण गमावून बसू नका.

**मकर :** शुभ रंग: लाल : शुभ दिशा: पश्चिम क्षेत्रात भेटणारे वरिष्ठ व अनुभवी यांच्याशी चर्चा यातून पुढील काळासाठीचा नवा कार्य प्रकल्प डोक्यात घोळू लागेल.


**सिंह :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम हितशत्रूंचे कळणारे डावपेच त्यांचे अडथळे दूर करण्यासाठी उपयुक्त ठरतील. पत्रव्यवहार यशस्वी होतील.

**कुंभ :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण उगाच ग्रासली जाणारी निराशा वेळीच दूर करा. कोणताही प्रश्न केवळ नशिबाने सुटत नसतो हे लक्षात घ्या.

**कन्या :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर काही कौटुंबिक प्रश्नात आपली ठाम भूमिका सर्वांनाच त्या प्रश्नातून बाहेर काढणारी ठरेल.

**मीन :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: उत्तर घरात मौल्यवान वस्तूंची खरेदी लांबणीवर टाकणे उचित ठरेल. मुलांचे यश आनंदात भर घालेल.

## पंचांग



| | |
|---|---|
| पंचांग | करण:बालव १४:३१:३५ |
| २० जानेवारी २०२५ | करण:कौलव |
| मंगळवार | २६:४२:४६+ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:मकर |
| माघ शके संवत्– १९४७ | चन्द्र:मकर |
| संवत्सर – विश्वावसूनाम | हिजरी सन् – १४४६ |
| अयन– दक्षिणायण | मुस्लिम मास –रज्जब |
| मास– माघ | तारीख – २९ |
| ऋतु – सौर शिशिर | विशेष |
| शुक्ल पक्ष | चंद्रदर्शन |
| तिथि:द्वितीया | धर्मनाथ बीजोत्सव |
| २६:४२:४६+ | – धामोरी , ब्रह्मगड |
| नक्षत्र:श्रवण १३:०६:३४ | सोनेवाडी (कोपरगाव) |
| योग:सिद्ध २०:००:२७ | |

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## आई–मुलींच्या नात्याच्या नाजूक छटा उलगडणारा 'तिघी'चा भावस्पर्शी टीझर प्रदर्शित

पुणे (दै. संध्या) :

आई आणि मुलींचं नातं हे केवळ रक्ताचं नसून, ते अनुभव, आठवणी, संस्कार आणि न बोललेल्या भावनांनी विणलेलं असतं. कधी अतूट जिव्हाळ्याचं, तर कधी न व्यक्त झालेल्या अपेक्षांमुळे निर्माण झालेल्या अंतराचं... तरीही अंतर्मनाने कायम एकमेकांशी घट्ट बांधलेलं. या नात्याच्या अशाच नाजूक, हळुवार आणि खोल छटा उलगडणारा 'तिघी' हा आगामी मराठी चित्रपट आहे. या चित्रपटाचा भावस्पर्शी टीझर नुकताच प्रदर्शित झाला असून, त्याने प्रेक्षकांच्या मनाला अलगद स्पर्श केला आहे.

अवघ्या काही क्षणांच्या या टीझरमधून एका घरातल्या तीन स्त्रियांच्या भावविश्वाची प्रभावी झलक अनुभवायला मिळते. आई आणि तिच्या दोन मुली यांच्यातील दुरावा, न बोललेल्या भावना, तणाव, आठवणी आणि तरीही त्या सगळ्याच्या पलीकडे असलेले प्रेम हे सगळं अतिशय वास्तवदर्शी पद्धतीने टीझरमध्ये मांडण्यात आलं आहे. कोणताही भडकपणा न करता, शांततेतून उलगडणाऱ्या भावनांचा हा प्रवास प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडतो. 'आईचं घर. हजार आठवणी.' ही चित्रपटाची टॅगलाईनच त्याचा आत्मा सांगून जाते. आठवणींनी भरलेलं घर आणि त्या घरातल्या 'तिघीं'चं अंतर्मन हा या कथेचा केंद्रबिंदू आहे. घर हे केवळ वास्तू नसून, तिथे साठलेल्या आठवणी, न बोललेले संवाद आणि मनातल्या कोपऱ्यात दडलेल्या भावना यांचं प्रतिबिंब ठरतं आणि हेच 'तिघी' ठळकपणे मांडतो.




चित्रपटाच्या दिग्दर्शिका जीजिविषा काळे म्हणतात, "आई आणि मुलीचं नातं अनेकदा शब्दांपलीकडचं असतं. प्रेम व्यक्त होत नाही, ते जाणवतं. वेदना बोलल्या जात नाहीत, त्या समजल्या जातात. 'तिघी'मधून आम्ही अशाच न बोललेल्या संवादांचा आणि न दिसणाऱ्या भावनांचा प्रवास दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. हा चित्रपट प्रत्येक स्त्रीच्या मनातल्या एका कोपऱ्याला नक्कीच स्पर्श करेल."

या चित्रपटात भारती आचरेकर, सोनाली कुलकर्णी आणि नेहा पेंडसे बायस यांच्या प्रमुख भूमिका असून सुप्री मीडिया प्रस्तुत आणि कोक्लिको पिक्चर्स निर्मित 'तिघी' या चित्रपटाची कथा व दिग्दर्शन जीजिविषा काळे यांनी केले आहे. चित्रपटाची निर्मिती निखिल महाजन, सुहृद गोडबोले, स्वप्निल भंगाळे आणि नेहा पेंडसे बायस यांनी केली आहे. आई–मुलींच्या नात्याकडे वेगळ्या, प्रगल्भ आणि संवेदनशील नजरेतून पाहाणारा 'तिघी' हा चित्रपट येत्या ६ मार्च रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### दर्जा आणि गुणवत्ता जागतिक स्पर्धेचे यशस्वी सूत्र : उद्योजक तुषार केळकर

पुणे (दैनिक संध्या) : आपण उद्योग करत असताना ज्या पदार्थाशी किंवा उत्पादनाशी संबंधित उद्योग करतो, त्याची आपल्याला आवड असणे गरजेचे आहे. केवळ पैशासाठी व्यवसाय केल्यास तो फार काळ टिकत नाही. खाद्यपदार्थ व्यवसायामध्ये ग्लोबल ब्रँडसोबत स्पर्धा करणे हे केवळ तुमच्या गुणवत्तेमुळेच शक्य होते. गुणवत्ता असेल तर निश्चितच ग्राहक तुमच्याकडे आकर्षित होतो, असे मत उद्योजक तुषार केळकर यांनी व्यक्त केले. मएसो सीनियर कॉलेज, पुणे, डिक्की नेक्स्टजेन, आणि लघु उद्योग भारती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या उद्यमी संवाद – कथा उद्योगाची प्रवास उद्योजकाचा भाग ८ या कार्यक्रमामध्ये सर्वेश देशपांडे यांनी तुषार केळकर यांची मुलाखत घेतली. नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संचालक प्रा. डॉ. देविदास गोल्हार, मएसो सीनियर कॉलेज, पुणे, प्राचार्य डॉ. रविंद्र वैद्य, उपप्राचार्या डॉ. पूनम रावत, स्टार्टअप सेल समन्वयक निलेश यादव आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. तुषार केळकर म्हणाले, आजच्या तरुणांनी नोकरी करत असताना केवळ नोकरीसाठी म्हणून आपला वेळ देऊ नये, तर त्यातून काहीतरी शिकून त्याचा व्यवसाय कसा करता येईल याचा विचार करणे गरजेचे आहे. मोठ्या उद्योगांशी स्पर्धा करताना आपण त्या उद्योगांपेक्षा वेगळे काय देऊ शकतो, हे सतत आपल्या डोक्यात असले पाहिजे. व्यवसायांचे अनुभव, त्यातून मिळालेले शिकवण, आलेल्या अडचणी तसेच अपयशावर मात करून यशस्वी कॅफे साखळी उभारण्यापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास सविस्तरपणे मांडला. यावेळी प्रा. डॉ. देविदास गोल्हार, यांनी स्टार्टअप जनजागृती व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणेचे भविष्यातील उपक्रमांबाबत मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचा हा उपक्रम इतर महाविद्यालयांपेक्षा एक पाऊल नक्कीच पुढे असून कौतुकास्पद आहे असे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. तेजस्विनी ढमाले विद्यार्थी सूत्रसंचालक म्हणून कार्यक्रमाची धुरा सांभाळली, तर कार्यक्रमाचा समारोप विद्यार्थीनी अनन्या पाटील ने आभार प्रदर्शन करून केला. प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

### श्री छत्रपती कारखान्याचा 69 वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

भवानीगनगर (दैनिक संध्या) : श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचा 69 वा वर्धापन दिन उत्साह मध्ये साजरा करण्यात आला. यावेळी संचालक अनिल काटे व व त्यांच्या पत्नी सौ नंदा अनिल काटे या उभयतांच्या हस्ते सत्यनारायण पूजा करण्यात आली.यावेळी कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक,उपाध्यक्ष कैलास गावडे यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित संचालक शिवाजीराव निंबाळकर, पृथ्वीराज घोलप,विठ्ठलराव शिंगाडे, अशोकराव पाटील,प्रशांत दराडे,अजित नरूटे, संतोष मासाळ,सतीश देवकाते,मंथन कांबळे,संचालिका सौ.सुचिता सचिन सपकळ,सौ.माधुरी सागर राजपुरे,कार्यकारी संचालक अशोक जाधव, जनरल मॅनेजर हनुमंत करवर,तांत्रिक सल्लागार महादेव निकम,चिफ केमिस्ट अमर जगताप, मुख्य शेती अधिकारी जालिंदर शिंदे,चिफ इंजिनियर निखिल रणवरे, कामगार नेते युवराज रणवरे,सर्व सभासद, कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चार वर्षांच्या मुलीच्या पोटातून चुंबकीय ब्रेसलेट काढण्यात यश

पुणे (दै. संध्या) :

नोबल हॉस्पिटल्स अँन्ड रिसर्च सेंटरच्या डॉक्टरांच्या टीमने एका चार वर्षांच्या मुलीच्या पोटातून गिळलेले चुंबकीय ब्रेसलेट काढण्यात यश मिळवले.या ब्रेसलेटने पोटात व आतडीमध्ये छिद्रे निर्माण केली होती.या ब्रेसलेटला लॅपॅरोटोमी या खुल्या प्रक्रियेच्या माध्यमातून काढण्यात आले.या मुलीची प्रकृती आता चांगली आहे.

सतत खोकला येत असल्याने या मुलीला तिचे आई-वडील खराडी येथील क्लिनिकमध्ये घेऊन गेले. तिथे इतर प्रतिक्षा करत असलेल्या रूग्णांबरोबर ते एक्स-रे घेऊन बसले होते.त्यावेळेस शेजारच्या रूग्णाने त्यांना डॉ.प्रमोद कटारे



यांचे नाव सांगितले आणि तेथून ते कटारे यांच्या क्लिनिकमध्ये गेले.

नोबल हॉस्पिटल्स अँन्ड रिसर्च सेंटर येथील गॅस्ट्रोइंटेरोलॉजिस्ट, हेपॅटोलॉजिस्ट आणि जीआय एंडोस्कोपिस्ट (पोटविकार, यकृत विकार आणि जठर रोग तज्ञ) डॉ.प्रमोद कटारे म्हणाले की तिच्या पोटात कुठली तरी बाहेरची वस्तू गेल्याचे एक्स-रे मध्ये दिसत होते.ही वस्तू त्या मुलीने गिळली होती हे पालकांना माहित नव्हते. परिस्थितीचे गांभीर्य बघता मी त्यांना लगेचच नोबल हॉस्पिटल मध्ये येण्याचा सल्ला दिला.

अशा परिस्थितीत बाहेरील वस्तू काढण्यासाठी सहसा एंडोस्कोपीचा वापर केला जातो.मात्र एंडोस्कोपी करताना आत गेलेली वस्तू ही ब्रेसलेट आहे,हे लक्षात आले.या गोल चुंबकीय ब्रेसलेटच्या बाजू एकमेकाला तशाच जोडलेल्या स्थितीत होत्या.त्यातील एक भाग पोटात होता आणि दुसरा भाग छिद्र करत छोट्या आतड्यातून पोटाच्या बाहेर आला होता.या अशा स्थितीमुळे एंडोस्कोपीच्या माध्यमातून ही वस्तू बाहेर काढणे शक्य नव्हते.त्याशिवाय हे ब्रेसलेट एका महत्त्वाच्या रक्तवाहिन्याच्या मागेपर्यंत पोहचले होते आणि छोट्या आतड्याच्या दोन भागांमध्ये याने छिद्र पाडले होते.याशिवाय पहिले छिद्र हे जठाराजवळ होते. उपचारात कुठलीही दिरंगाई ही जोखीम कारक होती. त्यामुळे खुली शस्त्रक्रिया करण्याचा आम्ही निर्णय घेतला.

यानंतर सीटी स्कॅन करण्यात आले,ज्यामधून ब्रेसलेटची गुंतागुंत आणि एकंदर परिस्थितीचे स्पष्ट चित्र दिसून आले. नोबल हॉस्पिटल्स अँन्ड रिसर्च सेंटर येथील बालरोग व नवजात शस्त्रक्रिया तज्ञ डॉ.प्रणव जाधव म्हणाले की,ही सर्व परिस्थिती लक्षात घेता आम्ही लॅपॅरोटोमी प्रक्रिया केली.या प्रक्रियेमध्ये ओटीपोटाच्या भिंतीला छिद्र पाडून शस्त्रक्रिया केली जाते.अनेक चुंबक असलेल्या या ब्रेसलेटमुळे पोटात आणि आतड्यात छिद्र निर्माण केले होते. याचबरोबर छिद्र पडल्यामुळे मलस्वरूपातील अन्न छिद्रातून बाहेर येऊन शरीरात पसरले असते तर त्या मुलीच्या जीवाला धोका निर्माण झाला असता.दोन तास चाललेल्या या शस्त्रक्रियेमध्ये आम्ही ब्रेसलेट बाहेर काढले व छिद्र पडलेल्या तीन ठिकाणी जखमा साफ करून तिथे टाके बसविले.

ही शस्त्रक्रिया 29 डिसेंबर 2025 रोजी करण्यात आली.त्यानंतर देखरेखीकरिता या मुलीला दोन दिवस अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले आणि एका आठवड्यात डिस्चार्ज देण्यात आला.पाठपुरावा करण्यासाठी 15 जानेवारी 2026 ला त्या मुलीचे आई-वडील तिला आमच्या क्लिनिकमध्ये घेऊन आले होते,असे डॉ.जाधव यांनी सांगितले.आता या मुलीची प्रकृती चांगली असून सामान्यपणे खाऊ-पिऊ शकते. डॉ.प्रमोद कटारे आणि डॉ.प्रणव जाधव या दोघांच्या मते लहान मुले 6 वर्षांची होऊपर्यंत त्यांच्यावर लक्ष ठेवणे गरजेचे आहे.याचे कारण कुठलीही वस्तू तोंडात घालण्याची सवय लहान मुलांना असते.काही वेळेला या वस्तू गिळल्या जातात. चुंबकीय ब्रेसलेटस,नाणी व इतर छोट्या या हानिकारक ठरू शकतात आणि म्हणूनच लहान मुलांपासून या दूर ठेवाव्यात.

## नेक्सस व्हेंचर पार्टनर्स यांच्या नेतृत्वाखाली गुंतवणूक

पुणे (दै. संध्या) :

भारतातील आघाडीच्या पूर्णपणे डिजिटल-असिस्टेड वेल्थ मॅनेजमेंट प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या ॲसेटप्लस (AssetPlus) ने ₹१७५ कोटींच्या निधी उभारणीची घोषणा केली आहे. ही फंडिंग फेरी नेक्सस व्हेंचर पार्टनर्स यांच्या नेतृत्वाखाली झाली असून, यामध्ये एट रोड्स व्हेंचर्स, नितीन कामथ यांचा रेनमॅटर फंड आणि बुपिंदर सिंग यांचाही सहभाग आहे. भारतात वितरक-केंद्रित, शाश्वत वेल्थ मॅनेजमेंट पायाभूत रचना उभारण्याच्या AssetPlus च्या दीर्घकालीन उद्दिष्टातील हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. केवळ व्यवहार किंवा साधनांपुरते संपत्ती निर्माण मर्यादित नसते, या मूलभूत विश्वासावर AssetPlus ची स्थापना झाली आहे. तंत्रज्ञान मानवी सल्ल्याची जागा न घेता त्याची ताकद वाढवेल, अशा समग्र 'असिस्टेड वेल्थ मॅनेजमेंट' परिसंस्थेची उभारणी कंपनी करत आहे. विश्वासार्ह आणि प्रमाणित वितरकांना सक्षम करून भारतीय कुटुंबांना अधिक परिणामकारक, सातत्यपूर्ण आणि व्यापक पातळीवर सेवा देता यावी, हा कंपनीचा मुख्य उद्देश आहे. AssetPlus चे सहसंस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी विश्रांत सुरेश म्हणाले, "आमचे उद्दिष्ट केवळ आणखी एक वितरण प्लॅटफॉर्म उभारण्याचे कधीच नव्हते. मानवी सल्ला आणि तंत्रज्ञानाद्वारे मिळणारी विस्तारक्षमता यांचा संगम साधणारी वेल्थ मॅनेजमेंट पायाभूत रचना आम्ही उभारत आहोत. दीर्घकालीन दृष्टीकोनातून भारताच्या वेल्थ इकोसिस्टमला बळकटी देण्यावर विश्वास ठेवणाऱ्या गुंतवणूकदारांसोबत ही दृष्टी वेगाने प्रत्यक्षात आणण्यासाठी हा निधी महत्त्वाचा ठरेल."

## पुन्हा एकदा साडे माडे तीनचा ट्रेलर म्हणजे फुल्ल ऑन हास्याचा डोस

### कुरळे बंधू पुन्हा गोंधळात

पुणे (दै. संध्या) :

कुरळे बंधू पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत... आणि यावेळी गोंधळ, गैरसमज आणि धमाल अधिकच वाढलेली दिसतेय! नुकताच प्रदर्शित झालेला 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' चा ट्रेलर पाहिला की, एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे हा चित्रपट फक्त हसवणारा नाही, तर शेवटपर्यंत उत्सुकता टिकवून ठेवणारा आहे.

रतन, मदन आणि चंदन यांच्या आयुष्यात ट्रेलरमध्ये सतत काही ना काही विचित्र घडताना दिसतंय. कधी परिस्थिती पूर्णपणे हाताबाहेर जाते, कधी गैरसमजांचा गुंता वाढतो, तर कधी बबनची खट्याळ एन्ट्री सगळंच गणित बदलून टाकते. वेगवेगळ्या स्वभावांची चार माणसं एकत्र आली की, काय काय घडू शकतं, याची भन्नाट झलक हा ट्रेलर देतो.

याच गोंधळात रिंकू राजगुरूची एन्ट्री विशेष लक्ष वेधून घेते. ती नेमकी कोण आहे, ती त्यांच्या आयुष्यात का आली आहे आणि तिच्या येण्याने सगळेच इतके अस्वस्थ का झाले आहेत, याचं थेट उत्तर ट्रेलर देत नाही. त्यामुळेच तिच्या भूमिकेबाबत एक कुतूहल निर्माण होतं. ही एन्ट्री योगायोग आहे की, एखाद्या मोठ्या वळणाची सुरुवात?

ट्रेलरमधील विनोदाचा टेम्पो जबरदस्त आहे. संवादांचा अचूक टाइमिंग, प्रसंगांची गंमत आणि कलाकारांमधील केमिस्ट्रीमुळे ट्रेलर एक क्षणही कंटाळवाणा वाटत नाही. बबनचा खोडकरपणा, मदनचा विनोदी अंदाज, चंदनची निरागसता आणि रतनचा ताठर स्वभाव हाच गोंधळ या ट्रेलरचा आत्मा आहे.

चित्रपटाबद्दल दिग्दर्शक अंकुश चौधरी म्हणतात, " 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' हा चित्रपट म्हणजे निव्वळ विनोद नाही, तर माणसांच्या स्वभावातून, परिस्थितीतून आणि




अचानक घडणाऱ्या प्रसंगांतून निर्माण होणाऱ्या गोंधळाची धमाल गोष्ट आहे. ट्रेलरमध्ये प्रेक्षकांना जी मजा, गडबड आणि हास्य दिसतंय, त्यापेक्षा अनेक पटींनी मोठा अनुभव चित्रपटात मिळणार आहे. प्रत्येक पात्राची एक वेगळी ओळख आहे आणि ती एकमेकांवर आदळली की, जी मजेशीर साखळी तयार होते, ती मोठ्या पडद्यावर अनुभवण्यासारखी आहे. प्रेक्षकांनी थिएटरमध्ये येऊन हा गोंधळ, हा विनोद आणि ही एनर्जी प्रत्यक्ष अनुभवावी."

अशोक सराफ, भरत जाधव, मकरंद अनासपुरे, सिद्धार्थ जाधव, संजय नार्वेकर यांसारख्या दिग्गज कलाकारांसोबत रिंकू राजगुरूची भूमिका या गोंधळात नेमकं काय वळण आणते, हे पाहाणं प्रेक्षकांसाठी नक्कीच रंजक ठरणार आहे. तसेच संजय नार्वेकर हेसुद्धा यात पाहुणे कलाकार म्हणून झळकणार आहेत. सुशीलकुमार अग्रवाल आणि अल्ट्रा मीडिया ॲण्ड एंटरटेनमेंट प्रस्तुत, उषा काकडे प्रॉडक्शन्स, ईओडी. मीडिया उदाहरणार्थ निर्मित आणि अमेय विनोद खोपकर पिक्चर्स यांच्या सहकार्याने प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटाचे दिग्दर्शन अंकुश चौधरी यांनी केले आहे. तसेच उषा काकडे, पुष्कर यावलकर, सुधीर कोलते, स्वाती खोपकर आणि निनाद नंदकुमार बत्तीन हे निर्माते आहेत. मोहसिन खान, यशराज टिळेकर, सौरभ ललवाणी आणि धनविक एंटरटेनमेंट सहनिर्माते असून स्मिथ पीटर तेलगोटे सहायक निर्माता आहेत. चित्रपटाचे छायाचित्रण प्रसिद्ध छायाचित्रकार संजय जाधव यांनी केले आहे. येत्या ३० जानेवारीला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

## शब्दांशिवाय नात्यांची गोष्ट सांगणारं 'माया'चं मोशन पोस्टर प्रदर्शित

पुणे (दै. संध्या) :

कधी कधी एखादं चित्रच खूप काही सांगून जातं... शब्दांशिवाय भावना व्यक्त करतं... आणि 'माया' या आगामी मराठी चित्रपटाचं मोशन पोस्टर मधून नेमकं हेच दिसतं. नातेसंबंधांवर भाष्य करणारा 'माया' या चित्रपटाचे मोशन पोस्टर नुकतेच प्रेक्षकांच्या भेटीला आले असून, पहिल्याच नजरेत ते मनाला स्पर्श करून जातं. हे पोस्टर केवळ चित्रपटाची झलक देत नाही, तर नात्यांमधील जिव्हाळा, तडे, अंतर आणि स्वीकार यांचा अर्थपूर्ण संवाद घडवून आणत आहे.

मोशन पोस्टरमध्ये वेगवेगळ्या पिढ्यांतील सदस्य एकत्र दिसतात. त्यांच्या नात्यांमधील समजूतदारपणा, आपुलकी, अंतर आणि तरीही टिकून राहाणारी माया हे भाव अतिशय शांतपणे मांडण्यात आल्याचे दिसतेय. पोस्टरमध्ये मुक्ताच्या हातात दिसणारा तुटलेला कप हा केवळ अपघाताने तुटलेली वस्तू नसून, तो नात्यांमधील तडे, न बोललेली दुःखं आणि आयुष्यात येणारी पोकळी दर्शवतोय. तो कप




पाहाताना मनात सहज प्रश्न पडतो, एखादं नातंही असंच नकळत तुटलेलं आहे का? ज्याच्या कडा अजूनही हातात आहेत, पण ते पूर्वीसारखं पूर्ण राहिलेलं नाही? हातात तुटलेला कप असतानाही मुक्ताच्या चेहऱ्यावरचं शांत, हलकंसं हास्य हे दुःख नाकारत नाही, तर स्वीकारत आहे, असे प्रतीत करतेय.

या चित्रपटाचे दिग्दर्शक आदित्य इंगळे म्हणतात, " 'माया' म्हणजे फक्त प्रेम नाही, तर एकमेकांना समजून घेणं, स्वीकारणं आणि काळाच्या ओघातही नातं जपणं. आयुष्यात सगळंच नीटनेटके असतं असं नाही. काही गोष्टी तुटतात, काही नाती बदलतात. मुक्ताच्या हातातील कप त्याचेच प्रतीक आहे, तर तिचं हास्य स्वीकाराचं. या मोशन पोस्टरमधून आम्हाला चित्रपटाची भावना शब्दांशिवाय पोहोचवायची होती."

शालिनी सिनेमाज आणि नितीन वैद्य प्रॉडक्शन निर्मित 'माया' चित्रपटाचे डॉ. सुनील दातार, अलका मधुकर दातार, नितीन प्रकाश वैद्य निर्माते आहेत. आदित्य इंगळे दिग्दर्शित या चित्रपट मुक्ता बर्वे, गिरीश ओक, सिद्धार्थ चांदेकर, विजय केंकरे आणि रोहिणी हट्टंगडी यांच्या प्रमुख भूमिका आहेत. येत्या २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सर्वत्र प्रदर्शित होणारा हा चित्रपट पोस्टरमुळे प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण करत असून, नात्यांच्या गुंत्यातून उमटणारी ही कथा प्रेक्षकांच्या मनाला नक्कीच भिडेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मानसी नाईकची मध्यवर्ती भूमिका असलेला "मन आतले मनातले"

पुणे (दै. संध्या) :

आशयसंपन्न कथा असलेल्या मराठी चित्रपटांमध्ये आता आणखी एका चित्रपटाची भर पडणार आहे. उत्तम स्टारकास्ट असलेला मन आतले मनातले हा चित्रपट १३ फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर लाँच करण्यात आले. सूर्य फिल्म वर्ल्ड प्रस्तुत "मन आतले मनातले" या चित्रपटाची निर्मिती सुरेन महापात्रा यांनी केली आहे. सुरेन महापात्रा यांनी चित्रपटाचं कथा आणि पटकथा लेखन, तर संवादलेखन मनोज सुधाकर येऊनकर यांनी केले आहे. तर जेम्स अँथनी यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे. अभिजित मजुमदार यांनी संगीत दिग्दर्शन, डॉ. सुनंदा डिवरे पळवणकर यांनी गीतलेखन केलं आहे. सुदर्शन सेनापती यांनी छायांकन, मलया आणि बिपिन यांनी संकलनाची जबाबदारी निभावली आहे. चित्रपटात



अभिनेत्री मानसी नाईक अभिनेता सुरेन महापात्रा, अभिनेता उपेंद्र लिमये, ऋतुराज फडके, संदीप गायकवाड, कमलेशन सावंत, अरूण नलावडे, यतीन कार्येकर, सिया पाटील, राजेश आहेर, विनित भोंडे अशी तगडी स्टारकास्ट आहे. अतिशय नावीन्यपूर्ण कथा, उत्तम स्टारकास्ट या चित्रपटात आहे. त्यामुळे हा चित्रपट प्रेक्षकांचं मनोरंजन करणारा आहे. या कथेतून मानवी आयुष्याचे वेगवेगले पदर, भावभावना उलगडण्यात आल्या आहेत. सूर्य फिल्म वर्ल्ड या निर्मिती संस्थेने आजवर ओडिया, हिंदी, तेलुगू, तमिळ, बंगाली भाषांतील चित्रपटांची निर्मिती केली आहे. आता "मन आतले मनातले" या चित्रपटातून ही निर्मिती संस्था मराठीमध्ये पदार्पण करत आहे.

# दहावा वार्षिक सप्लाय चेन मॅनेजमेंट पुरस्कार सोहळा संपन्न

पुणे (दै. संध्या) :

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मटेरियल्स मॅनेजमेंट (आयआयएमएम) पुणे शाखेतर्फे दहावा वार्षिक सप्लाय चेन मॅनेजमेंट पुरस्कार सोहळा नुकताच हॉटेल पंचरत्न येथे संपन्न झाला. याशिवाय आयआयएमएम पुणे शाखेला 60 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने हा सोहळा खास ठरला.

वार्षिक पुरस्कार सोहळ्यामध्ये उत्पादन व लॉजिस्टिक क्षेत्रातील कंपन्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना सन्मानित करण्यात आले. भारत विकास ग्रुप (बीव्हीजी) चे संस्थापक श्री.हणमंतराव गायकवाड यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सर्वोत्कृष्ट पब्लिक मोबिलिटी



अ‍ॅवॉर्ड हा महामेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.ला तसेच सर्वोत्कृष्ट सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी म्हणून भारत इलेक्ट्रॉनिक्सला प्रदान करण्यात आला.जॉन डिअर कंपनीच्या समीरा शेख यांना सप्लाय चेन क्षेत्रात महिलांच्या योगदानासाठी पुरस्कार प्रदान करण्यात आला.पुणे रिव्हर रिव्हायवल आणि माणदेशी फाऊंडेशन यांना अनसंग हिरो पुरस्कार प्रदान करण्यात आला.

तसेच उत्पादन क्षेत्रात मोठ्या उद्योग गटात कल्याणी मॅक्सीकॉन व्हील्स प्रा.लि., रिअल इस्टेट क्षेत्रात मोठ्या उद्योग गटात कोहिनूर ग्रुप,मध्यम उद्योग गटात लिगसी लाईफस्पेसेस एलएलपी यांना सर्वोत्कृष्ट सप्लाय चेन पध्दतींसाठी पुरस्कार देण्यात आला.ॲटलांटिक रोड सर्व्हिसेस प्रा.लि.ला (लघु) आणि ट्रान्सीक्युर लॉजिस्टिक (मध्यम) ला सर्वोत्कृष्ट रोड सर्व्हिस प्रोव्हाईडर पुरस्कार देण्यात आला.आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलला सर्वोत्कृष्ट आरोग्य सेवा संस्था म्हणून पुरस्कार देण्यात आला.

याप्रसंगी बोलताना प्रमुख पाहुणे व ॲम्फिनॉल इंटरकनेक्ट इंडिया प्रा.लि.चे संचालक व कार्यकारी अधिकारी रॉबर्ट जॉन म्हणाले की,सप्लाय चेन मॅनेजमेंट हे क्षेत्र भारताच्या आर्थिक व्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचे बनले आहे.पुरवठा साखळी व्यवस्थापन क्षेत्रात गेल्या दशकात आमुलाग्र परिवर्तन घडले आहे.देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर वस्तूंची अखंड वाहतूक व वितरण करण्यात तसेच व्यवसायांना कार्यक्षमतेने चालण्यास आणि ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यास लॉजिस्टिक्स क्षेत्राने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

आयआयएमएम पुणेचे अध्यक्ष सुहास गवस म्हणाले की,कार्यात्मक सहाय्य असण्यापासून ते व्यवसाय सातत्य,शाश्वतता आणि राष्ट्रीय विकासाचे धोरणात्मक प्रणेते बनण्यापर्यंत पुरवठा साखळी व्यवस्थापनाची भूमिका मूलभूतपणे पुन्हा परिभाषित झाली आहे. आजचे पुरवठा साखळी नेतृत्व केवळ या क्षेत्रात असलेल्या आव्हानांना पेलत नाही तर डिजिटलायझेशन,जबाबदारपणे संसाधनांचा वापर आणि सहयोगी परिसंस्थेद्वारे भविष्याला आकारही देत आहेत. मजबूत पुरवठा साखळ्या या अर्थव्यवस्थेचा कणा असतात.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महापौर पदासाठी गुरुवारी आरक्षण सोडत..!

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसह राज्यातील २९ महानगरपालिकांमधील महापौर पदांच्या आरक्षणाची सोडत गुरुवारी, दि.२२ जानेवारी २०२६ रोजी काढण्यात येणार आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने अधिकृत पत्रक जारी केले आहे. राज्यमंत्री (नगर विकास) यांच्या अध्यक्षतेखाली ही आरक्षण सोडत प्रक्रिया गुरुवारी दि.२२ रोजी सकाळी ११ वाजता मंत्रालय, मुंबई येथे पार पडणार आहे. या बैठकीत राज्यातील सर्व २९ महानगरपालिकांमधील महापौर पदांचे आरक्षण निश्चित करण्यासाठी सोडत काढण्यात येणार आहे. आगामी काळातील महापालिकांच्या राजकीय समीकरणांच्या दृष्टीने ही आरक्षण सोडत अत्यंत महत्त्वाची मानली जात असून, या प्रक्रियेवर राज्यातील सर्व महानगरपालिका तसेच राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. दरम्यान, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत भाजपाने निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले असून, १२८ पैकी ८४ नगरसेवक भाजपाचे निवडून आले आहेत. त्यामुळे महापौर पदासाठी कोणते आरक्षण पडणार आणि महापौरपदी कोण विराजमान होणार, याबाबत शहरात मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.




### जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुका महाविकास आघाडीच्या माध्यमातून

■ पाच पक्षांची एकजूट; जिल्हा परिषदेच्या ५ व पंचायत समितीच्या १० जागा लढवणार

वडगाव मावळ (दैनिक संध्या) : मावळ तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका महाविकास आघाडीच्या माध्यमातून लढविण्याचा निर्णय तालुक्यातील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना (उबाठा), मनसे व वंचित बहुजन आघाडी या पाच पक्षांनी घेतला आहे. जिल्हा परिषदेच्या 5 व पंचायत समितीच्या 10 अशा सर्व जागा महाविकास आघाडी लढविणार असल्याचे संबंधित पक्षांच्या प्रमुखांनी पत्रकार परिषदेत जाहीर केले. पत्रकार परिषदेस काँग्रेसचे तालुकाध्यक्ष यशवंत मोहोळ, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष दत्तात्रय पडवळ, शिवसेना उबाठा गटाचे नेते भारत ठाकूर, मनसेचे तालुकाध्यक्ष अशोक कुटे, वंचित आघाडीचे जिल्हाध्यक्ष संतोष लोखंडे यांच्यासह काँग्रेसचे सहादु आरडे, गणेश काजळे, विशाल वाळुंज, राजेश फलके, शिवसेनेचे उमेश गावडे आदी उपस्थित होते. काँग्रेसचे तालुकाध्यक्ष यशवंत मोहोळ म्हणाले, की शाहू-फुले-आंबेडकरांची विचारधारा घेऊन आम्ही या निवडणुकांना एकत्रितपणे सामोरे जाण्याचा निर्णय घेतला आहे. हीच विचारधारा घेऊन आम्ही नुकत्याच झालेल्या नगर परिषद नगरपंचायत निवडणूकामध्ये तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस सोबत जाण्याचा निर्णय घेतला, परंतु आम्ही ज्या जातीयवादी विचारांना दूर ठेवण्याचा प्रयत्न करतो त्यांनाच ते जवळ करण्याचा प्रयत्न करत आहेत, त्यामुळे आम्ही हा निर्णय घेतला असल्याचे सांगितले.

### पिंपळे गुरवमधील जुनी सांगवीत कचऱ्याचा विळखा; 'मॉडेल वॉर्ड' संकल्पनेवर प्रश्नचिन्ह

पिंपळे गुरव (दैनिक संध्या) : जुनी सांगवी येथील जयराज सोसायटीसमोरील मुख्य रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणावर कचरा टाकला जात असल्याने परिसरातील नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. प्लास्टिक पिशव्या घरगुती ओला-सुका कचरा सर्रास रस्त्यालगत फेकला जात असून, या ठिकाणी तीव दुर्गंधी पसरली आहे. कचरा वेळेत न उचलल्यामुळे परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच विदारक होत चालली असून, संपूर्ण परिसराला डंपिंग ग्राऊंडचे स्वरूप आले आहे. स्मार्ट सिटीच्या नावाखाली केवळ घोषणांची आतषबाजी केली जात असली, तरी प्रत्यक्षात नागरिकांच्या मूलभूत स्वच्छतेच्या प्रश्नाकडे प्रशासनाचे संपूर्ण दुर्लक्ष होत असल्याचे संतापजनक चित्र येथे पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे सांगवी परिसराची मॉडेल वॉर्ड म्हणून निवड करण्यात आली होती. स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि नागरी सुविधांचा आदर्श नमुना म्हणून या वॉर्डकडे पाहिले जात होते. मात्र, सध्याची अवस्था पाहता मॉडेल वॉर्ड ही संकल्पनाच फसवी ठरल्याचा थेट आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमुळे परिसरात भटकी कुत्री, डुक्कर, मांजरे तसेच मोकाट जनावरे व गाई, म्हशी मोठ्या संख्येने जमा होत आहेत. विशेष म्हणजे ज्या ठिकाणी नागरिकांना कचरा टाकू नये, यासाठी सुशोभीकरण करण्यात आले आहे त्याच ठिकाणी मोकाट जनावरांनी ठाण मांडले असून, तो परिसर अक्षरशः जनावरांचा अड्डा बनला आहे. अन्न शोधताना हे प्राणी रस्त्यावर येत असल्याने वाहनचालक व पादचारी यांच्यासाठी अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, डास-माशांचा प्रादुर्भाव वाढला आहे. परिणामी आजार पसरण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### पिंपरी-चिंचवडमधील जिम्नॅस्टीक खेळाडू अद्याप हॉलच्या प्रतीक्षेत

पिंपरी : (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरातील जिम्नॅस्टिक क्रीडा प्रकाराचे खेळाडू गेली अनेक वर्षे सुसज्ज जिम्नॅस्टीक हॉलच्या प्रतीक्षेत आहेत. गेल्या आठ ते दहा वर्षांपासून महापालिकेकडे सातत्याने मागण्या करूनही अद्याप एकही जिम्नॅस्टीक हॉल उभारण्यात आलेला नाही. त्यामुळे खेळाडू, प्रशिक्षकांतून नाराजी व्यक्त केली जात आहे. पिंपरी-चिंचवड जिल्हा जिम्नॅस्टिक असोसिएशनकडून या संदर्भात वारंवार पाठपुरावा केला जात असला, तरी महापालिकेची उदासीन भूमिका कायम आहे. शहरातील विविध क्रीडा प्रकारांना महापालिकेने सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. क्रिकेट, फुटबॉल, कबड्डी, स्केटिंगसाठी मैदाने असून बॅडमिंटनसाठी 16 हॉल आणि लॉन टेनिससाठी 12 कोर्ट उपलब्ध आहेत; मात्र जिम्नॅस्टीक या क्रीडा प्रकारासाठी एकही हॉल उपलब्ध नसल्याने खेळाडुंची गैरसोय होत आहे. शून्य सुविधा असलेला हा एकमेव क्रीडा प्रकार ठरत आहे. दरवर्षी राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये 100 हून अधिक, तर राष्ट्रीय स्तरावर 25 ते 30 खेळाडू सहभागी होत आहेत. असे असूनही जिम्नॅस्टीक हा खेळ महापालिकेच्या प्राधान्य यादीत नसल्याचे चित्र स्पष्ट होते. महापालिकेने चिंचवड, आकुर्डी, थेरगाव, निगडी परिसरात विविध क्रीडा प्रकल्प उभारले असले, तरी जिम्नॅस्टीक स्वतंत्र जागा वा निधी निश्चित करण्यात आलेला नाही.

# शहर देशात प्रथम क्रमांकाने ओळखले जाईल असे काम करू : काटे

पिंपरी (दै. संध्या) :

जगातील तिसऱ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता म्हणून भारताची अर्थव्यवस्था वेगाने विकसित होत आहे. सन २०४७ मध्ये देशाचा १०० वा स्वातंत्र्यदिन साजरा करीत असताना आपला देश विकसित भारत देश म्हणून जगभर ओळखला जावा, यासाठी आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार काम करीत आहे. वेगाने विकसित होणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आहे. यामध्ये सर्वच बाजूने पिंपरी चिंचवड शहराचे देखील मोठे योगदान आहे. स्थानिक स्वराज्य संस्था ते केंद्र सरकारपर्यंत एकाच विचाराचे सरकार असल्यास शहराचा आणि राज्याचा नियोजनबद्ध पद्धतीने वेगाने विकास करता येईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, सभापती



राम शिंदे, मंत्री चंद्रकांत पाटील, चंद्रशेखर बावनकुळे, पंकजाताई मुंडे, आमदार महेशदादा लांडगे, शंकर जगताप, उमाताई खापरे, अमित गोरखे, माजी खासदार अमर साबळे, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, दक्षिण आघाडी प्रदेशाध्यक्ष राजेश पिल्ले या मान्यवरांनी निवडणूक काळात शहरामध्ये प्रचार सभा गाजवल्या. त्यामुळे १५ जानेवारी रोजी झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत मतदारांनी एक हाती सत्ता देऊन विश्वास व्यक्त केला आहे. मतदारांच्या विश्वासास पात्र ठरून पिंपरी चिंचवड शहर देशात प्रथम क्रमांकाने ओळखले जाईल. यासाठी सर्व आमदार, खासदार, नगरसेवक, पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते यांना विश्वासात घेऊन नियोजनबद्ध पद्धतीने आगामी काळात काम करू अशी ग्वाही भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी दिली.

रविवारी (दि. १८) पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेस यावेळी आमदार महेशदादा लांडगे, अमित गोरखे, माजी खासदार अमर साबळे, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, प्राधिकरणचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, दक्षिण भारत आघाडी प्रदेशाध्यक्ष राजेश पिल्ले, शहर प्रवक्ता कुणाल लांडगे, शहर सरचिटणीस ॲड. मोरेश्वर शेडगे, विकास डोळस, मधुकर बच्चे, वैशाली खाडे, ज्येष्ठ नगरसेवक शितल उर्फ विजय शिंदे, माजी नगरसेवक राजू दुर्गे, सुजाता पालांडे आदी उपस्थित होते.

यावेळी शत्रुघ्न काटे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, २००७ च्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये शहरातील नागरिकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली व तत्कालीन शहराध्यक्ष तथा आमदार लक्ष्मण भाऊ जगताप, आमदार महेश दादा लांडगे, माजी खासदार अमर साबळे यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी चिंचवड मनपा मध्ये भाजपाला बहुमत दिले. त्यानंतरच्या काळात झालेल्या विकास कामांमुळे मतदारांनी भाजपावर विश्वास व्यक्त केला आहे. आता मेट्रोचे विस्तारीकरण, वाहतूक व्यवस्थेत सुधारणा, नियमित पाणीपुरवठा, नदी सुधार योजना, आरोग्य, वैद्यकीय, शिक्षण, कला, क्रीडा, महिला सुरक्षा, कायदा सुव्यवस्था, पर्यावरण अशा सर्व क्षेत्रांमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका देशात प्रथम क्रमांकाने ओळखली जावी यासाठी नियोजन केले जाईल असे शत्रुघ्न काटे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि सर्व भाजपाच्या आमदार, खासदारांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत भाजपची सत्ता यावी यासाठी अमूल्य मार्गदर्शन केले.

आमदार महेश दादा लांडगे, आमदार शंकर शेठ जगताप, आमदार उमाताई खापरे, आमदार अमित गोरखे, माजी खासदार अमर साबळे तसेच प्रदेश कमिटीचे सर्व पदाधिकारी, कोअर कमिटीचे सर्व सदस्य, सर्व माजी नगरसेवक, भाजपाच्या सर्व आघाडीचे अध्यक्ष प्रमुख पदाधिकारी, मंडल अध्यक्ष, बुथ प्रमुख, स्वयंसेवक यांनी सर्वांनी एकत्रित या निवडणुकीत परिश्रम घेतले. त्याची फलश्रुती म्हणून मतदारांनी भारतीय जनता पार्टीवर दाखवलेला विश्वास सार्थ ठरवू असेही शत्रुघ्न काटे यांनी सांगितले.

## मावळमध्ये भाजपचा 'राजकीय धक्का'

■ राष्ट्रवादीला युतीचा प्रस्ताव देत इंदोरी-वराळे पॅनल जाहीर

■ नाराज राष्ट्रवादी इच्छुकांचा भाजप प्रवेश

■ जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीत मोठी उलथापालथ

वडगाव मावळ (दै. संध्या) :

मावळ तालुक्यात जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या राजकीय घडामोडीत भाजपने राष्ट्रवादीला युतीचा प्रस्ताव देत दुसरीकडे राष्ट्रवादीच्या नाराज इच्छुकाला हेरून थेट इंदोरी वराळे गटाचा पॅनल जाहीर करून एकप्रकारे भाजपने राष्ट्रवादीला मधप्पाफ दिल्याचा प्रकार घडला आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी अधिकृत उमेदवार यादी जाहीर करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने आज सायंकाळी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार सुनील शेळके, जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव शिंदे, तालुकाध्यक्ष गणेश खांडगे यांच्यासह ज्येष्ठ नेते बबनराव भेगडे, रामनाथ वारिंगे, काळूराम मालपोटे, दीपक हुलावळे, भरत येवले, महादूबुवा कालेकर, ग्रामीण अध्यक्ष संदीप आंद्रे, युवक अध्यक्ष किशोर सातकर, महिलाध्यक्षा सुवर्णा राऊत आदी उपस्थित झाले. या वेळी राष्ट्रवादीची उमेदवारी जाहीर होणार हे अपेक्षित असताना आमदार शेळके व तालुकाध्यक्ष खांडगे यांनी आमच्याकडे भाजपचे कोअर कमिटी अध्यक्ष निवृत्ती शेटे, अण्णासाहेब दाभाडे यांनी युतीच्यादृष्टीने काही प्रस्ताव दिला असल्याने तूर्त आम्ही उमेदवार यादी स्थगित करत असल्याचे स्पष्ट केले. दरम्यान, याच कालावधीत पत्रकार परिषद सुरू होण्यापूर्वी इंदोरी वराळे गटातील राष्ट्रवादीचे इच्छुक उमेदवार मेघा भागवत व प्रशांत भागवत यांनी पक्षाकडून उमेदवारी मिळत नसल्याने आमच्यावर अन्याय होत असल्याचे कारण देऊन पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा देत असल्याचे पत्र सोशल मीडियावर व्हायरल केले. पत्रकार परिषद संपल्यानंतर काही वेळातच मेघा भागवत व प्रशांत भागवत यांचा केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, भाजप किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष गणेश भेगडे आदींच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश झाल्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले.

## श्रुती राम वाकडकर यांनी रचला इतिहास

# नगरसेविका होणाऱ्या वाकडकरांच्या पहिल्या सदस्या

पिंपरी (दै. संध्या) :

■ वाकड-ताथवडे-पुनावळे परिसरात जल्लोष

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूकीत प्रभाग क्रमांक २५ मधून भाजपाच्या उमेदवार श्रुती राम वाकडकर यांनी दणदणीत विजय मिळवत नवीन अध्याय रचला आहे. आजवरच्या इतिहासात वाकडच्या प्रतिष्ठित वाकडकर कुटंबियांना त्यांच्या रुपाने प्रथमच प्रतिनिधित्व करण्याची संधी प्राप्त झाली आहे. वाकडकर घराण्यातील पहिल्या-वहिल्या नगरसेविका म्हणून श्रुती वाकडकर सभागृहात जाणार असल्याने वाकड, ताथवडे आणि पुनावळे परिसरात विजयोत्सव सुरु आहे.




राहुल कलाटे यांच्या नेतृत्वात श्रुती राम वाकडकर, रेश्मा चेतन भुजबळ, कुणाल वाव्हळकर ह्या पॅनलच्या विजयामुळे ठिकठिकाणी फटाके फोडून, ढोल-ताशांच्या गजरात जल्लोष साजरा करण्यात आला. श्रुती वाकडकर यांनी क गटातून मुळशीचे माजी सभापती रमण पवार व माजी नगरसेविका यमुना पवार यांच्या स्नुषा तसेच उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते संदीप पवार यांच्या पत्नी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार चित्रा संदीप पवार यांचा तब्बल ११०२३ मतांनी दणदणीत पराभव केला. त्यांना २१८३७ इतकी भरघोस मते मिळाली.

श्रुती वाकडकर यांनी प्रचारादरम्यान स्थानिक प्रश्नांवर केंद्रित, सकारात्मक व विकासाभिमुख अजेंडा मांडत मतदारांशी थेट संवाद साधला. रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, आरोग्य सुविधा, महिला-सशक्तीकरण, युवकांसाठी क्रीडांगणे व उद्याने, तसेच मूलभूत नागरी सुविधांचा सर्वांगीण विकास हे त्यांच्या प्रचाराचे प्रमुख मुद्दे होते. त्यामुळे त्यांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या विजयामागे आमदार शंकर जगताप, शहराध्यक्ष शत्रुघ्न (बाप्पू) काटे, पॅनल प्रमुख राहुल कलाटे, भाजपा वरिष्ठ शहर उपाध्यक्ष राम वाकडकर यांचे प्रभावी मार्गदर्शन, तसेच भाजपाच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी केलेली मेहनत, घराघरात पोहोचलेला प्रचार आणि संघटित ताकद महत्त्वाची ठरली. विशेषतः महिला मतदारांचा मोठा पाठिंबा सौ. वाकडकर यांना मिळाल्याचे मतमोजणीच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले. त्यामुळे निवडणूक प्रचारादरम्यान या पॅनलने दिलेल्या वचननाम्याची पूर्तता नक्की होईल अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

> "हा विजय माझा वैयक्तिक नसून प्रभाग क्रमांक २५ मधील प्रत्येक मतदाराचा आहे. दिलेल्या विश्वासाला न्याय देत प्रभागाचा सर्वांगीण विकास, पारदर्शक कारभार आणि नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्यासाठी मी कटिबद्ध राहीन." या निकालामुळे प्रभाग क्रमांक २५ मध्ये भाजपाची पकड अधिक मजबूत झाली असून आगामी काळात या परिसराच्या विकासाला नवे बळ मिळेल.
>
> **– श्रुती राम वाकडकर नवनिर्वाचीत नगरसेविका, वाकड-ताथवडे-पुनावळे.**

## पुणे-मुंबई महामार्गावरील उघडलेला रस्ता अपघातांना आमंत्रण

**पंधरा दिवसांपासून डांबरीकरण रखडले; दुचाकीस्वारांचा जीव धोक्यात**

खराळवाडी (दै. संध्या) :

पुणे-मुंबई महामार्गावरील खराळवाडी येथे विठ्ठल-रखुमाई मंदिर ते दूरसंचार कार्यालयासमोर काही अंतरावर डांबर टाकण्यासाठी रस्ता जेसीबीच्या साह्याने डांबर उखडून काढले आहे. या गोष्टीला साधारण पंधरा ते वीस दिवस होऊन गेले आहे. याकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने वाहनचालकांना येथून प्रवास करताना अपघाताचा धोका संभवत आहे. काही दुचाकी घसरून पडलेल्या आहेत. यामुळे महापालिका प्रशासनाने संबंधित ठेकेदाराला सांगून येथील रस्त्याचे त्वरित डांबरीकरण करावे.

पुणे-मुंबई महामार्गावर दुचाकी घसरण्याचे प्रमाण वाढले आहे. महापालिका निवडणुकीच्या तोंडावर खराळवाडी परिसरातील उखडून ठेवलेला रस्ता किंवा खराळवाडी रस्त्यावर खडे पडलेले हे बुजवण्याचे काम प्रगतीपथावर चालू आहे; परंतु गेल्या पंधरा दिवसांपासून हे काम अपुरे राहिले असल्यामुळे अनेक दुचाकीस्वार या रस्त्यावर घसरुन जखमी झाले आहेत. तरी हे रखडलेले डांबरीकरण तात्काळ चालू करण्याची मागणी वाहनचालकांनी महापालिका बांधकाम विभागाकडे केली आहे.

पहिल्या टप्प्यात खराळवाडी गावठाण ते मध्यवर्ती भागातील रस्ते दुरुस्ती केली; परंतु काही भागात नकळत काही रस्ता दुरुस्ती करण्याचे राहून गेले आहेत. येस बँकेपासून ते दूरसंचार कार्यालयासमोरील रस्त्यावर डांबरीकरण करण्यात आले नाही. या परिसरात खराळवाडी उप पोस्ट कार्यालय, विठ्ठल-रखुमाई मंदिर, बडोदा बँक, पुढे एचए सोसायटी, हापकीन महामंडळ, वल्लभनगर बसस्थानक, महाविद्यालय आहे.

## भाजप पराभवाचा आढावा घेणार

पिंपरी (दै. संध्या) :

पालिकेच्या निवडणुकीत भाजपकडून 'अब की बार सौ पार' नारा देण्यात आला होता; परंतु काही ठिकाणी दिग्गज उमेदवारांचा पराभव झाला. तर, काही ठिकाणचे उमेदवार कमी मतांच्या फरकाने विजयी झाले. या पराभवाची कारणे शोधून त्याबाबतचा अहवाल प्रदेशाध्यक्षांकडे दिला जाणार असून, त्यानुसार संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी आमदार महेश लांडगे, अमित गोरखे, माजी खासदार अमर साबळे, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांसह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी शत्रुघ्न काटे यांनी सांगितले, की नेमक्या कोणत्या कारणामुळे आम्हाला काही प्रभागात पराभव सामना करावा लागला त्याची कारणे शोधत आहोत. तेथे कोणी पक्षविरोधी काम केले असल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाईल. शहरातील वाढत्या लोकसंख्येस अतिरीक्त पाणी उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

# 'उनकी जीत से ज्यादा.. हमारी हार के चर्चे..!'

**काळेवाडीत मच्छिंद्र तात्या तापकीरांनी शेवटच्या फेरीपर्यंत भाजपला घाम फोडला**

पिंपरी (दै. संध्या) :

महानगरपालिका निवडणुकीत काळेवाडी प्रभागात तीन जागांवर भाजप तर एका जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस विजयी झाली असली, तरी या निकालात सर्वाधिक चर्चा 'ड' गटातील भाजप विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस या थेट लढतीची होत आहे.

भाजपचे उमेदवार विनोद नढे विजयी ठरले असले, तरी राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार मच्छिंद्र तापकीर यांनी शेवटच्या फेरीपर्यंत दिलेल्या कडव्या झुंजीमुळे संपूर्ण प्रभागात राजकीय वातावरण तापलेले दिसून आले. त्यामुळेच "उनकी जीत से ज्यादा; हमारी हार के चर्चे!" अशी भावना सर्वत्र उमटताना दिसत आहे.

माजी नगरसेवक तसेच माजी विरोधी पक्षनेते असलेल्या मच्छिंद्र तापकीर यांना राष्ट्रवादी काँग्रेसने निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात उमेदवारी जाहीर केली. ऐनवेळी उमेदवारी मिळूनही तापकीर यांनी प्रचारात आक्रमक भूमिका घेत भाजपच्या विद्यमान नगरसेवक आणि उमेदवार विनोद नढे यांच्यापुढे मोठे आव्हान उभे केले. तुल्यबळ उमेदवार असल्याने ही लढत अटीतटीची ठरणार, याचे संकेत प्रचाराच्या पहिल्याच टप्प्यात मिळाले होते.

मतमोजणीदरम्यान प्रत्येक फेरीत दोन्ही उमेदवारांमध्ये मताधिक्याचा चढ-उतार पाहायला मिळाला. सुरुवातीपासूनच शेकड्यांत फिरणारे मतांचे अंतर, शेवटच्या फेरीपर्यंत कायम राहिल्याने भाजप आणि राष्ट्रवादी या दोन्ही गोटांत प्रचंड अस्वस्थता होती. प्रत्येक मत मोलाचे ठरत असताना शेवटच्या फेरीत भाजपचे उमेदवार विनोद नढे यांनी आघाडी घेतली आणि अखेर अवघ्या १३०० मतांच्या फरकाने मच्छिंद्र तापकीर यांचा विजय निसटला.

हा फरक आकड्यांमध्ये कमी असला, तरी त्याचे राजकीय अर्थ मोठे मानले जात आहेत. अनेक राजकीय अभ्यासक आणि स्थानिक मतदारांच्या मते, हा निकाल भाजपसाठी इशारा तर राष्ट्रवादी काँग्रेससाठी आगामी काळातील संधीचा स्पष्ट संकेत आहे. दीर्घकाळ सत्तेत असलेल्या भाजपला या प्रभागात इतक्या चुरशीच्या लढतीला सामोरे जावे लागणे, ही बाब पक्षासाठी आत्मपरीक्षणाची असल्याचे बोलले जात आहे.

या निवडणुकीत मच्छिंद्र तापकीर यांनी स्थानिक पातळीवरील प्रलंबित प्रश्न, अपूर्ण विकासकामे, नागरिकांच्या मूलभूत सोयीसुविधांचा अभाव यावर आक्रमकपणे बोट ठेवले. त्यांच्या प्रचाराला तरुण, महिला तसेच स्थानिक कार्यकर्त्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. निकाल जाहीर झाल्यानंतरही "तापकीर हरले असले, तरी त्यांनी मनं जिंकली," अशी चर्चा प्रभागात रंगताना दिसत आहे. काळेवाडीच्या राजकारणात ही लढत पुढील निवडणुकांसाठी दिशा ठरवणारी ठरेल, हे मात्र निश्चित..!



## थोडक्यात पण महत्वाचे...

### 25 जानेवारीला रक्तदान शिबीर; नगरसेवक मंगेशभाऊ कांडगे यांनी दिली माहिती

चाकण (दैनिक संध्या) : रक्ताचा तुटवडा भासू नये व अपघातग्रस्तांना तातडीने रक्ताचा पुरवठा होऊन त्यांचे प्राण वाचले जावेत हा हेतू डोळ्यासमोर ठेवून, चाकण येथे नवयुग मित्र मंडळाच्या वतीने रविवारी (दि.२५) भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती आदर्श नगरसेवक मंगेशभाऊ कांडगे यांनी दिली. येथील गोल्डन चौकातील दत्त मंदिरात येत्या रविवारी सकाळी नऊ ते दुपारी तीन या वेळात पुणे - पिंपरी चिंचवड ब्लड बँकेच्या सहकार्याने या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आरोग्य यज्ञात सहभागी व्हा, रक्तदान करून देश कार्य आणि देव कार्यात सहभागी व्हा. अपघात ग्रस्तांसाठी रक्तदान शिबिरे ही काळाची गरज आहे, याची जाणीव ठेवून नवयुग मित्र मंडळाच्या वतीने या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्याला सन्मानपत्र, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात येणार आहे. जास्तीत जास्त रक्तदात्यांनी या रक्तदान शिबिरात रक्तदान करण्याचे आवाहन नगरसेवक मंगेशभाऊ कांडगे यांनी नवयुग मित्र मंडळाच्या वतीने केले आहे.

### न्याय मागणे गुन्हा नाही, रस्ता मागणे बेकायदेशीर नाही : चंद्रकांत वारघडे

कोरेगावमूळ (दैनिक संध्या) : सर्वसामान्य नागरिकांनी न्याय मागणे हा कोणताही गुन्हा नसून, रस्ता मागणे ही बेकायदेशीर मागणी नाही, असे ठाम मत हवेली तालुका भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे सदस्य चंद्रकांत वारघडे यांनी व्यक्त केले आहे. परिसरातील अनेक ठिकाणी बाहेरून आलेल्या तसेच स्थानिक सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत असल्याचे चित्र समोर येत आहे. काही ठिकाणी स्थानिकांकडून पिळवणूक होत असल्याच्या तक्रारी सातत्याने प्राप्त होत आहेत. "आमचेच पाणी घ्यायचे", "बांधकामासाठी आमचीच जेसीबी, आमचीच खडी-वाळू आणि आम्ही सांगू त्या दरानेच घ्यायची", अन्यथा "रस्ता बंद केला जाईल", अशा प्रकारचा दबाव नागरिकांवर टाकला जात असल्याचे वारघडे यांनी सांगितले. आपण शक्य त्या पातळीवर संबंधित नागरिकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला असला, तरी हे प्रश्न एका व्यक्तीच्या प्रयत्नातून सुटणारे नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले. स्थानिक नेतृत्व, लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांनी या गंभीर विषयाकडे गांभीर्याने लक्ष देणे अत्यावश्यक आहे. केवळ निवडणुकीच्या काळात नागरिकांच्या प्रश्नांकडे लक्ष देणे योग्य ठरणार नाही, असा टोलाही त्यांनी लगावला. एका वस्तीचा रस्ता तब्बल एका वर्षापासून अडवून ठेवण्यात आला असल्याची धक्कादायक बाब त्यांनी निदर्शनास आणून दिली. याबाबत स्थानिक सरपंच व नेत्यांना अनेक वेळा माहिती देऊनही कोणताही तोडगा निघाला नाही. अखेर कायदेशीर मार्गाने तहसीलदारांकडे अपील करण्यात आले. रस्ता नसल्यामुळे नागरिक अडचणीत सापडल्यावर मानवीय दृष्टिकोनातून वनविभागाच्या जागेतून तात्पुरता रस्ता देण्यात आला होता, मात्र तो मार्गही आता बंद करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. "आता प्रश्न असा आहे की या नागरिकांनी न्याय कुठे आणि कुणाकडे मागायचा?" असा सवाल उपस्थित करत वारघडे म्हणाले की, एकीकडे महसूल मंत्री पाणंद रस्ते मोकळे करण्याबाबत निर्णय घेत आहेत; मात्र प्रत्यक्षात जर सर्वसामान्य नागरिकांना अशा प्रकारे त्रास सहन करावा लागत असेल, तर त्या निर्णयांची अंमलबजावणी कधी होणार? प्रशासन, महसूल विभाग, पोलीस यंत्रणा आणि लोकप्रतिनिधींनी या विषयात तातडीने लक्ष घालून कायद्यानुसार कारवाई करावी व नागरिकांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी त्यांनी केली.

### किर्लोस्कर फेरस कंपनीच्या सर्व कंत्राटी कामगारांना कामासाठी कंपनीचे दरवाजे खुले

जेजुरी (दैनिक संध्या) : कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी १४ व १५ जानेवारी २०२६ रोजी सर्व कंत्राटदारांसोबत सविस्तर बैठक घेतली. या बैठकीत कंत्राटी कामगारांच्या तक्रारी थेट ऐकून घेतल्या गेल्या तसेच स्थानिक समुदायाला अर्थपूर्ण रोजगाराच्या संधी देण्याची आमची बांधिलकी पुन्हा स्पष्ट करण्यात आली. सर्व कंत्राटी कामगारांना कंपनीचे दरवाजे खुले असल्याचे किर्लोस्कर फेरस कंपनीच्या अधिकृत प्रवक्त्यांनी सांगितले. कंत्राट दारांशी चर्चेनंतर कंत्राटदारांनी कंपनीच्या दिशेवर पूर्ण विश्वास व्यक्त केला असून, कंत्राटी कामगारांना दिशाभूल करणाऱ्या खोट्या व अप्रमाणित बातम्यांना सक्रियपणे विरोध करण्यास ते सहमत झाले आहेत. तसेच रोजगाराशी संबंधित तक्रारी व प्रश्न सोडवण्यासाठी तृतीय-पक्ष संस्थांच्या मदतीने दोन दिवसांच्या कार्यक्रमादरम्यान कारखाना परिसरात तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला होता. या कक्षाला मोठ्या संख्येने कंत्राटी कर्मचाऱ्यांनी भेट दिली. तसेच कंपनीच्या नेतृत्वाने ग्रामपंचायत सदस्यांशीही चर्चा केली असून, कंपनीची उपस्थिती ही परिसराच्या दीर्घकालीन विकास व समृद्धीसाठी असल्याचे स्पष्ट केले आहे. २०२२ मध्ये किर्लोस्कर १३७ वर्षांची भक्कम मूल्ये व ठाम नैतिक तत्त्वांवर उभी असलेली भारतीय कंपनी यांनी हा कारखाना ताब्यात घेतल्यानंतर सकारात्मक बदल सर्व संबंधितांना स्पष्टपणे दिसून आला आहे. आम्ही पुन्हा एकदा स्पष्ट करू इच्छितो की कामावर येणे थांबवलेल्या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी कंपनीचे दरवाजे खुले आहेत. काही कर्मचाऱ्यांनी आधीच काम सुरू केले असून, उर्वरित कर्मचारीही लवकरच कामावर हजर होतील आणि चुकीच्या माहितीच्या प्रभावाखाली येणार नाहीत, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे.", असे किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज लिमिटेडच्या अधिकृत प्रवक्त्यांनी सांगितले.

### संस्कार, संस्कृती आणि लोककलेचा उत्सव : वार्षिक स्नेहसंमेलन दिमाखात

आळंदी (दैनिक संध्या) : ध्यास फौंडेशन संचलित महर्षी वाल्मिकी बालक मंदिर, महर्षी वाल्मिकी विद्यावर्धिनी तसेच डॉ.माधवराव सानप विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन आणि 'ध्यास पर्व' अंक २ चा प्रकाशन सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. "महाराष्ट्राची लोकधारा" या संकल्पनेवर आधारित विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांना मराठी संस्कृतीच्या मुळाशी नेऊन ठेवले. यावेळी संपादक दिपक दराडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. संस्थाध्यक्ष डॉ.माधवराव सानप, विश्वस्त चंद्रकांत लिंगायत, मुकुंद कुलकर्णी, संचालिका अक्षता कुलकर्णी, व्यवस्थापक गोपाल उंबरकर यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती लाभली. मार्गदर्शन करताना दीपक दराडे म्हणाले, "यशस्वी आयुष्य म्हणजे केवळ नोकरी किंवा व्यवसाय नव्हे, तर समाज आणि देशासाठी योगदान देण्याची भावना रुजवणे होय. मूल्यसंस्कार आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज आहे." संस्थाध्यक्ष डॉ.माधवराव सानप यांनी आपल्या मनोगतातून गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करत शैक्षणिक गुणवत्ता, पारदर्शकता आणि संस्कारक्षम शिक्षणपद्धतीवर भर दिला. "महाराष्ट्राची लोकधारा" या थीमवर आधारित बालवाडी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेली नृत्ये कार्यक्रमाची खास ओळख ठरली. खेडेगावातील लोप पावणारी संस्कृती, जुने खेळ, संतपरंपरा, छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास, लाठी-काठी प्रात्यक्षिके तसेच मराठी शाळा वाचवा या संदेशासह सादरीकरण करण्यात आले. लता मंगेशकर, सावित्रीबाई फुले, सिंधुताई सपकाळ, झाशीची राणी लक्ष्मीबाई, लक्ष्मीकांत बेर्डे यांना नृत्यांद्वारे भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली.

# वाणेवाडीत ट्रॉलीभर ऊस अंगावर पडूनही बाप-लेक सुखरूप

## 'देव तारी त्याला कोण मारी'ची आली अनुभूती

सोमेश्वरनगर (दै. संध्या)

वाणेवाडी (ता. बारामती) येथे ऊस भरून येणाऱ्या ट्रॅक्टरला जोडलेल्या ट्रॉलीचा ॲक्सल तुटला. त्यामुळे चाक तुटून ट्रॉली क्षणांत पलटी झाली आणि शेजारून चाललेल्या दुचाकीवर तीन-चार टन ऊस कोसळला. शेजारच्या चव्हाणवस्तीवरील ग्रामस्थांनी धावाधाव करत काही मिनिटांतच ऊस बाजूला केला आणि दुचाकीवरील बाप-लेकांना सुखरूप बाहेर काढले. युवराज काशिनाथ भिसे (वय ५०) आणि काशिनाथ गोपाळा भिसे (वय ७०) (दोघेही रा. होळ ता. बारामती) अशी जखमींची नावे आहेत.

वाणेवाडी येथे रविवारी (ता. १८) दुपारी बाराच्या सुमारास ऊसतोड मजुरांचा डंपीग ट्रॅक्टर (क्र. एम.एच. २५ ए.एस. ७६६५) ऊस भरलेली ट्रॉली घेऊन सोमेश्वर कारखान्याकडे येत होता. वाणेवाडी- होळ रस्त्यावरील अंबामाता मंदिराजवळच्या चढावर असताना ट्रॉलीचा ॲक्सल तुटला. त्यामुळे ट्रॉलीचे एक चाक निखळले आणि ट्रॉली पलटी होऊन ट्रॉलीतील ऊस वाणेवाडीकडून होळकडे जाणाऱ्या स्प्लेंडर दुकाचीवर पडला. ट्रॉलीवरील उसावर बसलेले दोन ऊसतोड मजूर बाजूला फेकले गेले. मात्र, दुचाकी आणि त्यावरील दोघे उसाखाली अडकले. प्रवासी तरुण आणि शेजारच्या चव्हाणवस्तीवरील महिला आणि पुरुष त्वरित कोयता, विळा, कुऱ्हाड घेऊन धावले. पटापट ऊस कापून सुरुवातीला दोघांना मोकळे केले. एका तरुणाने तोवर तातडीने सोमेश्वर कारखान्याचे संचालक ऋषी गायकवाड यांना फोन लावला. गायकवाड यांनी रुग्णवाहिकेसह घटनास्थळी पोहोचत जखमींना नजीकच्या रूग्णालयात दाखल केले. महेश युवराज भिसे म्हणाले, "चव्हाणवस्ती ग्रामस्थांचे आभार मानावे तेवढे थोडे आहेत. वडील आणि आजोबा सुखरूप आहेत. दुचाकीची मोडतोड झाली आहे. रस्त्याकडेचे लोक ट्रॉलीचे चाक वाकडे-तिकडे फिरत आहे, हे सांगत होते, पण संबंधित चालक जोरात गाणी लावून चालला असल्याने त्याला ऐकू आले नाही. कारखान्याने, मुकादमानेही उपचारासाठी मदत केली.

दरम्यान, नादुरूस्त ट्रॉलीतून ऊसवाहतूक करणाऱ्या आणि स्पीकरवर मोठ्या आवाजात गाणी लावणाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज निर्माण झाली आहे.



# ज्ञानसागरचे खेळाडू शासकीय राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणार

बारामती (दै. संध्या)

राजुरी येथे दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,राज्यस्तरीय शालेय शासकीय थाई बॉक्सिंग स्पर्धा २०२५–२६ मोठ्या उत्साहात व यशस्वीपणे पार पडल्या. या स्पर्धेत ज्ञानसागर गुरुकुल, सावळ (ता. बारामती, जि. पुणे) येथील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या व पुणे विभागाच्या नावलौकिकात भर घातली. या स्पर्धेत शाळेचे दोन होतकरू खेळाडू सोहेल मुस्ताक खान (१७ वर्ष वयोगट, ४० ते ४४ किलो वजन गट) व सार्थक सुदर्शन ताकमोगे (१७ वर्ष वयोगट, ४८ ते ५२ किलो वजन गट) यांनी आपापल्या वजन गटात उत्कृष्ट कौशल्य, ताकद व शिस्तबद्ध खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला. या घवघवीत यशासह दोन्ही खेळाडूंनी सुवर्णपदक (Gold Medal) मिळवून उपस्थितांची मने जिंकली. तसेच या स्पर्धेत सुकृत दिलीप तुपे (१९ वर्ष वयोगट, ७० ते ७५ किलो वजन गट) आणि प्रतीक संतोष गवळी (१९ वर्ष वयोगट, ४८ ते ५२ किलो वजन गट) या दोन्ही खेळाडूंनी तृतीय क्रमांक पटकावत कांस्यपदक (Bronze Medal) मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली. या सर्व खेळाडूंनी पुणे विभागाचे प्रतिनिधित्व करत पुणे विभागाचे नाव उज्वल केले.



सोहेल खान — सार्थक ताकमोगे

या सुवर्णयशामुळे सोहेल मुस्ताक खान व सार्थक सुदर्शन ताकमोगे यांची आता राष्ट्रीय स्तरावरील (National Level) शालेय शासकीय थाई बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली असून, ते आगामी राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. त्यांच्या या निवडीमुळे शाळा, पालकवर्ग व क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

विशेष म्हणजे, या राज्यस्तरीय स्पर्धेत पुणे विभागाने एकूण १७ सुवर्णपदकांची कमाई करत संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला असून, चॅम्पियनशिप ट्रॉफी जिंकण्याचा मान पुणे विभागाला मिळाला आहे. ही कामगिरी पुणे विभागासाठी अत्यंत अभिमानास्पद व प्रेरणादायी ठरली आहे.

या यशाबद्दल ज्ञानसागर गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष डॉ सागर आटोळे सर यांनी संस्थेच्या वतीने खेळाडूंचे अभिनंदन करण्यात येत असून, राज्यस्तरीय शालेय शासकीय थाई बॉक्सिंग स्पर्धेत ज्ञानसागर गुरुकुलच्या खेळाडूंनी मिळवलेले हे घवघवीत यश अत्यंत अभिमानास्पद आहे. सोहेल मुस्ताक खान व सार्थक सुदर्शन ताकमोगे यांनी कठोर परिश्रम, शिस्त, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर सुवर्णपदक पटकावून राष्ट्रीय स्तरावर झेप घेण्याचा मान मिळवला, ही आमच्या संस्थेसाठी गौरवाची बाब आहे.

ज्ञानसागर गुरुकुलमध्ये शैक्षणिक गुणवत्तेसोबतच क्रीडा, शारीरिक तंदुरुस्ती व व्यक्तिमत्त्व विकासाला समान महत्त्व दिले जाते. कारण खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, संयम, संघभावना आणि संघर्षातून विजय मिळवण्याची मानसिकता तयार होते. आजच्या स्पर्धात्मक युगात हे गुणच विद्यार्थ्यांना यशाच्या शिखरावर पोहोचवतात.

या यशामागे खेळाडूंचे अथक परिश्रम, प्रशिक्षक गणेश घुले यांचे मार्गदर्शन, पालकांचे पाठबळ आणि शाळेतील सकारात्मक क्रीडासंस्कृती कारणीभूत आहे. पुणे विभागाने संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावून चॅम्पियनशिप ट्रॉफी मिळवणे, हे विभागातील सर्व खेळाडूंसाठी प्रेरणादायी ठरेल. राष्ट्रीय स्तरावरही आमचे खेळाडू उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचे, पुणे विभागाचे व महाराष्ट्राचे नाव उज्वल करतील, असा मला पूर्ण विश्वास आहे. भविष्यातही ज्ञानसागर गुरुकुलमधून असेच गुणवंत, शिस्तप्रिय व देशाचा अभिमान वाढवणारे विद्यार्थी घडत राहतील, हीच आमची प्रेरणा व ध्येय आहे.

## विद्याधाम प्रशाला शिरूर येथे कायदेविषयक जनजागृती शिबिर संपन्न

शिरूर (दै. संध्या)

आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे तर कायदेविषयक जागरूकताही तितकीच आवश्यक असल्याच्या उद्देशाने विद्याधाम प्रशाला, शिरूर येथे विद्यार्थ्यांसाठी कायदेविषयक जनजागृती व मार्गदर्शन शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले. या शिबिराला घोडनदी न्यायालयाचे माननीय न्यायाधीश डी. बी. डोमाळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना कायदा, न्यायव्यवस्था व सामाजिक जबाबदाऱ्या यांची ओळख करून देण्यात आली. घोडनदी वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. उदय सरोदे यांनी कायदेविषयक जनजागृतीचे महत्त्व स्पष्ट करताना विद्यार्थीदशेतच योग्य-अयोग्याची जाणीव निर्माण झाली तर समाज अधिक सक्षम होतो, असे प्रतिपादन केले. ॲड. वीरेंद्र सावंत यांनी बालविवाह प्रतिबंधक कायद्याबाबत सविस्तर माहिती देत बालविवाहाचे सामाजिक, मानसिक व कायदेशीर दुष्परिणाम विद्यार्थ्यांसमोर मांडले. ॲड. साहेबराव जाधव यांनी रॅगिंगचे दुष्परिणाम, त्यावरील कायदेशीर तरतुदी व त्यातून होणारे गंभीर परिणाम स्पष्ट केले. रॅगिंगमुळे विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य बिघडते व भवितव्य धोक्यात येते, त्यामुळे अशा प्रवृत्तींपासून दूर राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

# अभिनय सेमिनार आणि नव्या वेबसिरीजचा एकत्रित भव्य मुहूर्त संपन्न

लोणी काळभोर (दै. संध्या)

महाशिवा एंटरटेनमेंट आणि आज्ञा कल्चरल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय अभिनय सेमिनार तसेच नव्या मराठी वेबसिरीज "कश्यासाठी...? ... प्रेमासाठी!" चा मुहूर्त रविवारी मोठ्या उत्साहात पार पडला.

या सेमिनारला परिसरातील विद्यार्थी, पालक आणि अभिनय क्षेत्रात रस असलेल्या तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अभिनय शिकण्याची आवड असलेल्या नवोदित कलाकारांसाठी हे सेमिनार मार्गदर्शक ठरले.



सेमिनारमध्ये फिल्म व टीव्ही अभिनयाचे प्राथमिक धडे, कॅमेरा ॲक्टिंग, स्टेज डेअरिंग, व्हॉइस मॉड्युलेशन आणि एक्सप्रेशन कंट्रोल या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. सहभागी विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे अभिनयाचा अनुभव घेतला.

याच कार्यक्रमात महाशिवा एंटरटेनमेंट निर्मित "कश्यासाठी...? ...प्रेमासाठी!" या नव्या वेबसिरीजचा अधिकृत मुहूर्त संपन्न झाला. "वय बदलतं, पण प्रेम नाही...!" ही टॅगलाईन असलेली ही सिरीज विविध वयोगटांतील प्रेमकथा मांडणार असून १४ फेब्रुवारी व्हॅलेंटाईन डे पासून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

यावेळी बोलताना आयोजक विजयराज चव्हाण यांनी सांगितले, "आजच्या मोबाईल युगात मुलांना योग्य दिशेने मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. अभिनयासारख्या कलांमुळे मुलांचा आत्मविश्वास वाढतो, विचारशक्ती विकसित होते आणि ते सकारात्मक गोष्टींकडे वळतात. अशाच हेतूने आम्ही अभिनय प्रशिक्षण आणि प्रोजेक्ट्स सुरू केले आहेत." सेमिनारच्या शेवटी सहभागी विद्यार्थ्यांकडून सकारात्मक प्रतिक्रिया मिळाल्या असून अनेकांनी आगामी 21 Days Acting Certificate Course साठी नावनोंदणी केली आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाशिवा एंटरटेनमेंट आणि आज्ञा कल्चरल फाउंडेशनच्या संपूर्ण टीमने विशेष परिश्रम घेतले.

# पोलीस ठाण्यात तक्रार देणाऱ्या डॉक्टरवर प्राणघातक हल्ला

चाकण (दै. संध्या)

■ एकावर गुन्हा दाखल : भांबोली येथील प्रकार

दोन महिन्यांपूर्वी महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दिल्याप्रकरणी डॉक्टरला शिवीगाळ, दमदाटी करत व जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने डॉक्टरवर लाकडी दांडक्याने प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. खेड तालुक्यातील भांबोली येथे गुरुवारी (दि.१५) सायंकाळी साडेसात वाजण्याच्या दरम्यान हा प्रकार घडला होता. महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलिसांनी याप्रकरणी रविवारी रात्री उशिरा एकावर गुन्हा दाखल केला. डॉ. राजेंद्र शेषराव वनवे (वय - ४०, रा. संतकृपा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, भांबोली, ता. खेड) यांनी याप्रकरणी महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. डॉ. वनवे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भाऊसाहेब महादू गायकवाड (वय - ५३, रा. भांबोली, ता. खेड ) याच्यावर गंभीर मारहाणीचा व विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. अधिक माहिती अशी की, डॉ. वनवे यांनी महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात दोन महिन्यांपूर्वी यातील संशयित भाऊसाहेब गायकवाड व त्यांचा मुलगा तुषार गायकवाड यांच्याविरुद्ध लेखी तक्रार अर्ज दिला होता. त्याचा राग मनात धरून चिडलेल्या गायकवाड यांनी फिर्यादी डॉ. वनवे यांच्या कारला हात दाखवून त्यांची कार थांबवली. भाऊसाहेब हा त्यांच्या कार जवळ आला असता फिर्यादी यांनी कारची काच उघडली. त्यावेळी भाऊसाहेब गायकवाड यांनी माझ्याविरुद्ध तू पोलिसात तक्रार करतो काय, तुला दाखवतो असे म्हणून त्यांनी फिर्यादी वनवे यांच्या तोंडावर बुक्कीने जोरदार ठोसा मारून जखमी केले. त्यानंतर डॉक्टरांना कारच्या बाहेर ओढून काढले. रस्त्यालगत पडलेल्या एका लाकडी दांडक्याने डॉक्टरांना दोन्ही हाता पायावर मारून गंभीर जखमी केले. तुला बघून घेतो अशी धमकी दिली व गायकवाड तिथून निघून गेल्याचे डॉ. वनवे यांनी फिर्यादीत म्हटले आहे. महाळुंगे इंगळे उत्तर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिगंबर सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास सुरू आहे.

## भोरमध्ये अभिनेत्याकडून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन

भोर (दै. संध्या)

भोर, येथील भोर एज्युकेशन सोसायटीच्या राजा रघुनाथराव विद्यालयात रविवारी (ता. १८) सकाळी झालेल्या सकाळ चित्रकला स्पर्धेत तालुक्याच्या विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये १४ मूकबधिर विद्यार्थ्यांचा समावेश आहे. सैराट चित्रपटातील अभिनेता सुरेश विश्वकर्मा यांनी स्पर्धेच्या ठिकाणी हवेली लावून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. भोर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन प्रमोद गुजर, मुख्याध्यापक लक्ष्मण भांगे, कलाशिक्षक विश्वास निकम, सोमनाथ कुंभार, अजय कोठावळे, दीपक येडवे आदींसह विद्यार्थी व पालक उपस्थित होते. विद्यालयाच्या प्रांगणामध्ये विद्यार्थ्यांनी 'सकाळ' आकारामध्ये बसून चित्रे काढली. अभिनेता सुरेश विश्वकर्मा आणि प्रमोद गुजर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून काढणाऱ्या चित्रांबाबत माहिती घेतली.

# पाणी, कचरा समस्या सोडवून वाहतूक कोंडी मार्गी लावू

## जीवनशेठ खराबी यांचा निर्धार

चाकण (दै. संध्या)

चाकण - तळेगाव दाभाडे या रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामाला मुहूर्त मिळाला ही कौतुकास्पद बाब असून, हे काम तातडीने आणि युद्ध पातळीवर सुरू व्हावे, आणि उद्योग नगरीतील वाहतूक कोंडी कमी व्हावी, त्यासाठी मी प्रयत्नशील राहणार आहे. पाणी, कचरा समस्या सोडवून, पर्यावरण वाढीसाठी पुढाकार घेणार असल्याचा निर्धार खराबवाडीचे माजी सरपंच जीवनशेठ खराबी यांनी केला आहे.

जीवनशेठ खराबी यांनी सांगितले की, " वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी आणि प्रवास अतिजलद होण्यासाठी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळाने अर्थात एमएसआयडीसीने पुणे जिल्ह्यात दोन रस्ते प्रकल्प हाती घेतले आहेत. चाकण, तळेगाव व शिक्रापूर या दरम्यानच्या महामार्गावर वाहनांची संख्या मागील काही वर्षात प्रचंड वाढली आहे. तळेगाव, महाळुंगे इंगळे व चाकण या औद्योगिक वसाहतीत याच मार्गाने अवजड वाहने येत असल्याने व रुंदीकरणाचे काम रखडल्याने या महामार्गावरचा वाहतुकीचा ताण प्रचंड वाढला आहे. या कोंडीतून आता सुटका होण्यासाठी मी स्वतः प्रयत्न करणार आहे. चाकण ते खालुंबरे या दरम्यान रस्त्यालगत पडलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी पुढाकार घेणार असून, नागरिकांनी रस्त्यालगत कचरा टाकू नये व इतरांना त्यापासून त्रास होऊ नये असे आव्हान करणार आहे." पाणी, कचरा, विज, वाहतूक कोंडी या समस्या मार्गी लावण्याबरोबच या भागातील बेरोजगार तरुणांना नोकऱ्या मिळवून देण्यासाठी आतापर्यंत प्रयत्न केले आहेत.





# युद्ध जिंकण्यास शस्त्र आणि युग घडविण्यास आई लागते

पुणे (दै. संध्या)

■ व्याख्याते गणेश शिंदे यांचे मत

■ अंजनीबाई विठ्ठलराव मोहिते प्रतिष्ठानच्या वतीने माऊली व प्रेरणा पुरस्कार वितरण सोहळा

आई असणे ही फार सुंदर भावना आहे. आपले बालपण कुठपर्यंत आहे? याचा कधीतरी विचार करायला हवा. जेव्हा आई जाते, तेव्हा बालपण संपते. ममत्वाचा आनंद घ्यायला शिकले पाहिजे. ही संधी ज्यांनी हेरली, त्यांनी महापुरुष घडविले. युद्ध जिंकण्यास शस्त्र लागतात आणि युग घडविण्यास आई लागते, असे मत व्याख्याते गणेश शिंदे यांनी व्यक्त केले.

अंजनीबाई विठ्ठलराव मोहिते प्रतिष्ठानच्या वतीने स.प. महाविद्यालयाच्या लेडी रमाबाई हॉल मध्ये ८ व्या माऊली पुरस्कार व प्रेरणा पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परिमंडळ २ चे उपायुक्त मिलिंद मोहिते, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, प्रतिष्ठानचे विक्रांत मोहिते, विराज मोहिते आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर सामाजिक कार्यकर्ते उदय जगताप यांच्या मातोश्री हेमलता जगताप यांना माऊली पुरस्कार आणि रस्त्यावरच्या उपेक्षित मुलांना मायेची उब देणाऱ्या व शिक्षणाची वाट उजळविणाऱ्या दादाची शाळा या संस्थेला प्रेरणा पुरस्कार प्रदान करण्यात आला. संस्थापक अभिजीत पोखर्णिकर यांनी पुरस्कार स्विकारला. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. नवनिर्वाचित नगरसेवक कुणाल टिळक, स्वप्नाली पंडित, स्वरदा बापट, राघवेंद्र उर्फ बापू मानकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

मिलिंद मोहिते म्हणाले, आम्ही पोलीस म्हणून काम करताना समाजातील अंधाऱ्या बाजू बघत असतो. त्यावेळी समाजासाठी काम करणाऱ्या काही प्रकाशवाटा दिसल्या की त्या पणत्या तेवत रहाव्या, असे नेहमी वाटते. त्यामुळे उदय जगताप आणि दादाची शाळा सारख्या संस्थांचे कार्य असेच सुरु रहायला हवे.

उदय जगताप म्हणाले, समाजसेवा जिवंत ठेवण्यासाठी पुढच्या पिढीने काम करायला हवे. पुढच्या पिढीला दिशा देण्याचे काम पुण्यात मोहिते परिवाराचा हा ग्रुप करीत आहे. कोणतेही काम करताना संपूर्ण कुटुंब आपल्या सोबत असते, त्या सगळ्यांना हा पुरस्कार दिला गेला. नाती टिकून कुटुंब एकत्र येणे ही आज काळाची गरज आहे.

अभिजीत पोखर्णिकर म्हणाले, आज तरुणांकडे वेगळ्या दृष्टीने पहिले जाते. तरुण पिढी वाया जात आहे, असे अनेकांना वाटते. पण अनेक तरुण असे आहेत की जे चांगले काम करीत आहेत. तरुण मुले चांगले काम करू शकतात, फक्त त्यांना संधी देण्याची आवश्यकता आहे. पुण्यात १४ हजार ४२७ मुले सिग्नलवर आहेत, हा २०१९ चा आकडा आहे. सन २०२६ मध्ये हा आकडा किती असेल, याचा अंदाज आपण घ्यायला हवा. आपण पुण्यात सिग्नलवर मुले पाहतो, त्यांना फक्त दया दाखवतो. पण निरंतन काळ टिकणारे आपण त्यांना द्यायला हवे.

# मुंबईचा महापौर महायुतीचाच होणार : नवनाथ बन

मुंबई (दै. संध्या)

■ संजय राऊतांनी दिवास्वप्ने पाहू नयेत



महापालिका निवडणुकीत भाजपा-शिवसेनेच्या महायुतीच्या विकासाच्या धोरणाला तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर विश्वास ठेवत मुंबईतील मतदारांनी महायुतीला भरभरून कौल देत उबाठा सेनेला त्यांची जागा दाखवून दिली आहे. जनमताचा आदर राखत मुंबई महापालिकेचा महापौर महायुतीचा होणार आहे आणि महायुतीचा भगवा फडकणार आहे. ज्या दिवशी मुंबई महापालिकेचा महापौर महायुतीचा होईल तो दिवस मुंबईकरांसाठी सुवर्ण दिवस असणार आहे आणि उबाठा गटासाठी 16 जानेवारी हा निकालाचा दिवस काळा दिवस ठरला आहे अशी सणसणीत टीका भारतीय जनता पार्टीचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी सोमवारी केली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. संजय राऊतांनी कितीही मुंबईच्या महापौरपदाची दिवास्वप्ने पाहिली तरी ती पूर्ण होणार नाहीत असा प्रहारही त्यांनी केला.

यावेळी श्री. बन म्हणाले की, कुठल्या पक्षाचा महापौर व्हावा हा महायुतीचा अजेंडा कधीच नव्हता. मुंबई महापालिकेत 25 वर्ष सत्ता उपभोगताना उबाठा गटाने मुंबईला लुटले होते. ती लूट थांबवून मुंबईचा विकास आणि मुंबईकरांचे जीवन सुकर आणि सुरक्षित करणे हे एकच ध्येय महायुतीचे आहे. भाजपा, शिवसेनेचे वरिष्ठ नेते चर्चेअंती लवकरच निर्णय घेतील तोपर्यंत राऊतांनी वायफळ बडबड करू नये. राऊत जी-जी स्वप्ने पाहतात ती कधीच पूर्ण होत नाहीत, अशी कोपरखळीही श्री. बन यांनी मारली. 29 पैकी 25 ठिकाणी भाजपा अव्वल ठरली आहे, हा विजय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासाच्या राजकारणाचा आहे असेही त्यांनी नमूद केले.

मानखुर्द शिवाजीनगर मुळे लोकसभा निवडणुकीत भाजपाचा उमेदवार पराभूत झाला होता हे जनतेला कळून चुकले होते. त्या पराभवाचा बदला घेण्याचे काम मतदारांनी यावेळी केले आणि विकासाला कौल देत भाजपाचा उमेदवार म्हणून मला निवडून दिले असे श्री. बन यांनी नमूद केले. मानखुर्दमध्ये मला मिळालेला विजय हा एका व्यक्तीचा नव्हे तर हा त्या परिसरातील भाजपा कार्यकर्त्यांचा विजय आहे.

राजकारणामध्ये कधीही काही होऊ शकते. आज राऊतांना उपरती होऊन त्यांनी चक्क मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले आहे. खरे तर राऊतांच्या कौतुकपर शब्दांची देवेंद्रजींना गरजच नाही, कारण त्यांचे काम आणि विकास कामे यामुळेच मतदारांचा आशीर्वाद कायम मिळत आला आहे. पण तरीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केल्याबद्दल भाजपाच्या संस्कारांनुसार आभार मानतो असा श्री. बन यांनी खोचक टोला लगावला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, भीतीपोटी नगरसेवकांना एकत्रित ठेवले नाही. भीती शिवसेनेला नाही तर उबाठा गट आणि राऊतांना आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नवनियुक्त नगरसेवकांचा एकमेकांशी परिचय व्हावा या उद्देशाने नगरसेवकांना एकत्र हॉटेलमध्ये ठेवले आहे. त्यावरून राऊतांनी उगाच खयाली पुलाव शिजवू नये. नगरसेवकांना एकत्रित ठेवण्यामुळे कुठे वेगळी आघाडी जन्माला येईल, नवे समीकरण तयार होईल अशा हाकाट्या पिटू नयेत असा टोला श्री. बन यांनी लगावला.

## बिहार भवन होणार असेल तर त्यात गैर काय?

महाराष्ट्रात बिहार भवन होणार असेल तर त्यात गैर काय आहे, असा सवाल करत श्री. बन म्हणाले बिहारमध्ये देखील महाराष्ट्र भवन आहे. ठिकठिकाणी महाराष्ट्र भवने आहेत बाहेरून आलेल्या पाहुण्यांची सोय व्हावी या हेतूने ही भवने वेगवेगळ्या राज्यात उभारली जातात. या विषयावरून मनसे विनाकारण प्रांतवाद उकरून काढत आहे. अशा पद्धतीचा प्रांतवाद, भाषावाद केल्यामुळे मनसे पक्षाची काय अवस्था झाली याचा विचार राज ठाकरे यांनी करावा असा टोला श्री. बन यांनी लगावला.



# रेश्मा खान यांची संयोजकपदी निवड

पुणे (दै. संध्या)

नॅशनल कॉन्फरन्स फॉर मायनॉरिटीच्या पश्चिम महाराष्ट्र अर्थात पुणे विभागाच्या संयोजक (कन्वेनर) पदावर कोंढवा येथिल सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती रेश्मा खान यांची निवड करण्यात आली आहे. नॅशनल कॉन्फरन्स फॉर मायनॉरिटीचे अध्यक्ष राहुल डंबाळे यांच्या अध्यक्षतेखालील पार पडलेल्या विशेष बैठकीत खान यांची निवड करण्यात आली आहे. याप्रसंगी राहुल डंबाळे यांचेसह समीर पटेल, ॲड. दानीश पठाण, असिफ खान, निलोफर मुल्ला, प्रभु सुनगर आदी पदाधिकारी उपस्थित होते. अल्पसंख्याक समुदायाच्या अधिकारांवर काम करणाऱ्या कार्यकर्त्या म्हणून रेश्मा खान परिचित असुन त्यांच्या निवडीचे सर्वस्तरातुन स्वागत करण्यात येत आहे.

# अवयवदान या विषयावर सीएमई परिषदेचे आयोजन

पुणे (दै. संध्या)



नोबल हॉस्पिटल्स अॅन्ड रिसर्च सेंटर तर्फे अवयवदान प्रक्रिया,नियमावली (डिसीज्ड ऑर्गन डोनेशन,प्रोसेसस,प्रोटोकॉल्स अॅन्ड केस बेस्ड लर्निंग) या विषयावर रूग्णालयाच्या सभागृहात सीएमई परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये या क्षेत्रात कार्यरत 100 हून अधिक लोकांनी भाग घेतला. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन नोबल हॉस्पिटल्स अॅन्ड रिसर्च सेंटरचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.दिलीप माने,संचालक दिविज माने,समुह कार्यकारी अधिकारी डॉ.संजय पठारे यांसह झोनल ट्रान्सप्लांट कॉर्डिनेशन ऑफिसर आरती गोखले,रूबी हॉल क्लिनिक येथील न्युरो क्रिटिकल केअर चे प्रमुख व सिनियर इंटेसिव्हिस्ट डॉ.कपिल झिरपे,सह्याद्रि हॉस्पिटल येथील प्रत्यारोपण समन्वयक मयुरी बारगे,झेडटीसीसी पुणेच्या सहसचिव व प्रत्यारोपण शल्यचिकित्सक वृषाली पाटील,नोबल हॉस्पिटल्समधील यकृत प्रत्यारोपण शल्यचिकित्सक डॉ.मनोज श्रीवास्तव आणि वरिष्ठ मुत्रपिंड तज्ञ व ट्रान्सप्लांट फिजिशियन डॉ.अविनाश इग्नेशियस यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

झेडटीसीसीच्या झोनल ट्रान्सप्लांट कॉर्डिनेशन ऑफिसर आरती गोखले आरती गोखले यांनी अवयव दान आणि त्यानंतरच्या प्रक्रियेबाबत कार्यप्रणालीची माहिती दिली.तसेच विविध समित्यांची भूमिका आणि जबाबदाऱ्यांवर प्रकाश टाकला.त्या म्हणाल्या की,जेव्हा पुण्यात 1997 मध्ये पहिले प्रत्यारोपण झाले त्यावेळेस मेंदूमृत ही संकल्पना लोकांना समजून सांगायला लागायची. त्यापासून ते आजवर आपण मोठा पल्ला गाठला आहे आणि अवयवदानाविषयी जनजागृती आणि संबंधित कर्मचाऱ्यांचे नियमित प्रशिक्षण चालू ठेवणे महत्त्वाचे आहे.

डॉ.कपिल झिरपे म्हणाले की,अवयवदानामुळे 8 गरजू रूग्णांना नवजीवन मिळू शकते या जाणिवेने मृत रूग्णांकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टीकोन बदलला आहे. दात्यांची संख्या वाढवण्यापलीकडे मेंदूमृत झालेल्या रूग्णाकडून दान केल्या जाणाऱ्या अवयवांची संख्या वाढविण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.यासाठी सर्वांत वरिष्ठ तज्ञांच्या देखरेखीखाली योग्य दाता आणि प्राप्तकर्ता व्यवस्थापन गरजेचे आहे. नोबल हॉस्पिटल्स अॅन्ड रिसर्च सेंटरचे संचालक डॉ.दिविज माने म्हणाले की,अवयवदान जागरूकता हे आमच्या सर्व जनजागृती कार्यक्रमांचा एक मुख्य भाग राहिला आहे.नुकतेच गेल्या वर्षी गणेशोत्सवात आमच्या 400 कर्मचाऱ्यांनी विक्रमी वेळेत अवयवदानाची प्रतिज्ञा केली.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### व्हाट्सअॅपचा वापर प्राथमिक डिजिटल प्लॅटफॉर्म म्हणून सुरु




मुंबई (दैनिक संध्या) : भारतातील उपभोग-नेतृत्वाखालील वाढ आता मोठ्या महानगरांपुरती मर्यादित राहिलेली नाही. मागणी, उद्योजकता आणि दीर्घकालीन आर्थिक गती टियर 2 आणि टियर 3 शहरे, उदयोन्मुख शहरे आणि लहान शहरांमध्येही वाढत आहे. सुरुवातीच्या टप्प्यातील ग्राहक ब्रँडना समर्थन देणारी व्हेंचर कॅपिटल फर्म रुकम कॅपिटलने त्यांचा नवीनतम संशोधन अहवाल "बियॉन्ड मेट्रो: द रिअल स्टोरी ऑफ इंडियाज नेक्स्ट 500 मिलियन" प्रकाशित केला आहे, जो मेट्रो नसलेले ग्राहक ब्रँड कसे शोधतात, त्यावर विश्वास ठेवतात आणि खरेदी करतात हे उघड करतो. रुकम कॅपिटलच्या संस्थापक आणि व्यवस्थापकीय भागीदार अर्चना जहागीरदार म्हणाल्या, "भारताकडे बऱ्याच काळापासून मेट्रो शहरांच्या दृष्टिकोनातून पाहिले जात आहे, ज्यामुळे ग्राहकांबद्दलची आपली समज मर्यादित झाली आहे. या अभ्यासातून असे दिसून आले आहे की ग्राहक अधिक आत्मविश्वासू होत आहेत. ते विचारपूर्वक खरेदी करतात, सखोल संशोधन करतात, समुदायाच्या शिफारशींवर अवलंबून असतात आणि जाहिरातींपेक्षा ठोस पुराव्यांवर विश्वास ठेवतात. हे ग्राहक केवळ इच्छेनुसार खरेदी करत नाहीत, तर त्यांच्या गरजांनुसार माहितीपूर्ण निर्णय घेतात. म्हणूनच, ब्रँड्सनी विश्वास निर्माण करणे, वापरण्यास सोपी उत्पादने डिझाइन करणे आणि स्थानिक गरजा पूर्ण करणे यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. तरच त्यांची शाश्वत आणि दीर्घकालीन वाढ सुनिश्चित होईल." हा अहवाल अशा वेळी आला आहे जेव्हा भारतातील आर्थिक क्रियाकलाप महानगरांच्या पलीकडे जात आहेत. भारतातील 65% लोकसंख्या टियर 2, टियर 3 आणि ग्रामीण भागात राहते. अहवालानुसार, जीएसटी अंमलबजावणीची सोपी अंमलबजावणी, परवडणाऱ्या किंमती, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचा जलद विस्तार, सर्वव्यापी 3जी/4जी कव्हरेज आणि यूपीआयची सुरुवात यासारख्या अनेक प्रगतीमुळे भारतातील लहान शहरे उपभोग वाढीचे पुढील प्रमुख इंजिन बनली आहेत.

### मनोरंजनातून रस्ता सुरक्षेबाबत प्रबोधन

पिरंगुट (दैनिक संध्या) : 'चित्रगुप्त, याने हेल्मेट घातलेले नाही त्यामुळे याचे नाव डायरीत लिहून घे." "जी यमराज., लगेच लिहितो. पण यावेळी त्याला आपण समज देऊ. पुढील वेळी त्याची गय करू नका." "चित्रगुप्त , यांनी बेल्ट लावून गाडी चालविली आह . त्यांचा सत्कार कर." "होय महाराज. त्यांचा दोघांचाही (पती पत्नीचा) सन्मान करू चला." हा संवाद रंगला होता सूस (ता. मुळशी) येथील रहदारीच्या रस्त्यावर. बावधन वाहतूक पोलिसांच्या वतीने रस्ता सुरक्षा अभियानानिमित्त वाहनचालकांना वाहतुकीचे नियम, धोके, अपघाताच्या वेळी करावयाची कार्यवाही आदींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्यानिमित्त यमराज आणि चित्रगुप्त अशा दोघांच्या वेशातील कलाकारांनी भर रस्त्यावर वाहनचालकांची चांगलीच करमणूक केली. मनोरंजनातून प्रबोधन ही संकल्पना राबविताना या दोन पात्रांची मदत घेण्यात आली होती. वरिष्ठ पोलिस निरीक्षक शंकर डामसे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला होता. यावेळी वरिष्ठ पोलिस निरीक्षक शंकर डामसे, दीपक गोसावी, उपनिरीक्षक दत्तात्रेय थिगळे, हेमंत पळसकर, सचिन खोपकर, अजित कुटे, अमोल पारधी, अमोल जाधव, प्रशांत डावरे, सुरेश जायभाय आदींच्या पथकाने या उपक्रमात सहभाग घेतला होता.

# थम्स अपने प्रख्यात लोगोला नवीन रूपात केले सादर

मुंबई (दै. संध्या)




थम्स अप या भारतातील स्वदेशी कोला कंपनीचा प्रतिष्ठित लोगो आहे. आज, ब्रँडने नवीन ओळखीचे अनावरण केले, ज्यामधून धोरणात्मक बदल दिसून येण्यासोबत आधुनिक काळातील भारतीयांच्या महत्त्वाकांक्षा, आत्मविश्वास आणि प्रत्येक क्षणाचा उत्साहात आनंद घेण्याची जिद्द निदर्शनास येते.

थम्स अपच्या इन-हाऊस डिझाइन टीमने डिझाइन एजन्सी सुपरअल्ट्रेअर सोबत सहयोगाने हा रिब्रँड विकसित केला आहे. या नवीन ओळखीसह गेल्या 2 दशकांमध्ये थम्स अपने पहिल्यांदाच लोगोच्या लुकमध्ये बदल केला आहे. भविष्यासाठी प्रबळ वारसावर डिझाइन करण्यात आलेला नवीन लुक अधिक डायनॅमिक व लक्षवेधक व्हिज्युअल देतो. ब्रँडचा ट्रेडमार्क लोगो खास आठवणींना पुढे घेऊन जातो आणि स्थापनेपासून केवळ तीन वेळा लुकमध्ये बदल करण्यात आला आहे. प्रत्येक लुकमधून युवा संस्कृतीचे बदलते स्वरूप आणि भारतातील तरूणांचा उत्साह दिसून येतो. नवीन ब्रँड लुकमध्ये थम्स अपच्या विशिष्ट प्रॉपर्टीचा प्रभाव व ताकद कायम ठेवण्यात आली आहे, ज्यामध्ये प्रगतीशील व समकालीन उत्साहाची भर करण्यात आली आहे. टाइपोग्राफी आकर्षक व लक्षवेधक आहे. तीन रंग स्पाइस रेड, आइस ब्ल्यू आणि स्टॉर्म ब्ल्यू ब्रँडच्या संपन्न वारसामधून प्रेरित आहेत, तसेच स्वाद, थंडरस रिफ्रेशमेंट आणि साहसी व्यक्तिमत्त्वाचे प्रतीक आहेत. या लुकमध्ये मानवी अंगठ्याचे चिन्ह कायम ठेवण्यात आले आहे, ज्यासह ब्रँडचा अतूट उत्साह अधिक दृढ करण्यात आला आहे. नवीन व्हिज्युअल ओळखीमधून आजच्या तरूणांचा आत्मविश्वास, साधारण गोष्टींना आव्हान करण्याची क्षमता आणि दररोज साहसी नवीन अनुभव घेण्याचे धाडस दिसून येते. हा लोगो भविष्यासाठी सानुकूल करण्यात आला आहे, जो रिटेल दुकानांमध्ये सर्वांचे लक्ष वेधून घेईल. कोका-कोला इंडिया व साऊथवेस्ट एशियाच्या स्पार्कलिंग फ्लेवर्सच्या वरिष्ठ संचालिका सुमेली चॅटर्जी म्हणाल्या, जवळपास पाच दशकांपासून थम्स अप तरूण संस्कृतीमधील महत्वपूर्ण प्रेरक राहिले आहे, जे साहसी व निरंतर आत्मविश्वासासह अद्वितीय तूफानी उत्साहाला सादर करते. त्यांची प्रख्यात टेस्ट द थंडर लाइन, अद्वितीय स्वाद आणि साहसी संवादाने अनेक पिढ्यांना प्रेरित केले आहे, ज्यामुळे भारतातील तरूणांचे आवडते पेय बनले आहे.

# पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मराठी चित्रपटांना प्रचंड प्रतिसाद

पुणे(दै. संध्या)

पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा(पिफ)त मराठी चित्रपटांना प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. 'बाप्या', 'जीव', 'तिघी', 'सोहळा' आणि 'गोंधळ', या चित्रपटांना प्रेक्षकांच्या रांगा लागल्या होत्या.

बाप्या, जीव, गोंधळ आणि तिघी हे चित्रपट मराठी चित्रपट स्पर्धेत असून, सोहळा हा चित्रपट 'आजचा मराठी सिनेमा' या विभागात दाखवण्यात आला. गोंधळ या चित्रपटाला प्रेक्षकांची मोठी रंग लागली होती.

व्यक्तीची लिंग ओळख आणि कुटुंब, समाजाच्या मानसिकतेवर संयत पण प्रभावी भाष्य करणारा 'बाप्या' पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा(पिफ)त मराठी स्पर्धा विभागात प्रदर्शित करण्यात आला. गिरीश कुलकर्णी आणि राजश्री देशपांडे यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाला प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

कोकणातील दापोलीच्या पार्श्वभूमीवर चित्रित करण्यात आलेल्या या चित्रपटात लिंग बदल आणि त्याला समाजाकडून मिळणारा प्रतिसाद या विषयावर प्रकाश टाकण्यात आला आहे. चित्रपटानंतर बोलताना दिग्दर्शक समीर तिवारी म्हणाले, की लिंग बदल हा विषय चित्रपटासाठी अवघड आणि प्रथमच मराठीमध्ये हाताळण्यात आला आहे.

अभिनेते गिरीश कुलकर्णीच्या म्हणाले, "अत्यंत संवेदनशील असा हा विषय वेगळ्या पद्धतीने हाताळण्यात आला आहे."

# रोटरी क्लब ऑफ पुना डाउनटाउनचा वर्धापनदिन साजरा

पुणे (दै. संध्या)



रोटरी क्लब ऑफ पुना डाउनटाउनने आपल्या सेवा कार्याच्या ४० गौरवशाली वर्षांचा उत्सव मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने ई-स्क्वेअर, द फर्न हॉटेल येथे आयोजित भव्य वर्धापनदिन सोहळ्यात साजरा केला. या सोहळ्यात क्लबच्या चार दशकांच्या सेवाभावी कार्याचा, मैत्रीभावाचा आणि समाजावर केलेल्या सकारात्मक प्रभावाचा आढावा घेण्यात आला.

या कार्यक्रमास रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१चे गव्हर्नर संतोष मराठे, माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर शीतल शाह, पंकज शाह, माधव बोराटे , माजी रोटरी इंटरनॅशनल डायरेक्टर डॉ. महेश कोटबागी यांच्यासह अन्य माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर, असिस्टंट गव्हर्नर, डॉ. झिम्रा इस्राएल, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी तसेच रोटरी क्लब ऑफ पुणे डाउनटाउनचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी रोटरी क्लब ऑफ पुना डाउनटाउनच्या स्थापनेपासूनचा प्रवास, महत्त्वाचे टप्पे आणि विविध सेवाप्रकल्पांचा आढावा घेणारा माहितीपट (लघुपट) सादर करण्यात आला. या चित्रफितीस उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

क्लबच्या अध्यक्षा अदिती भेंडे म्हणाल्या, "आमच्या प्रकल्पांनी अनेक स्तरांवर समाजातील गरजूंचे जीवन स्पर्शिले आहे. 'गिफ्ट ऑफ मोबिलिटी – एल एन ४ या प्रकल्पांतर्गत आम्ही संपूर्ण भारतभर १४ हजारांहून अधिक कृत्रिम हात (प्रोस्थेटिक हँड्स) मोफत वितरित केले आहेत. याशिवाय, शिक्रापूर येथे दिव्यांग मुलांसाठी शाळा इमारतीचे बांधकाम, बोपोडी येथील पुणे खेडेकर रुग्णालयात मोफत आयसीयू व डायलिसिस केंद्र, क्षयरोगग्रस्त रुग्णांसाठी पोषण किट्स, मूत्रपिंड आरोग्य जनजागृती, वंचितांसाठी नेत्र तपासणी व अनुदानित मोतीबिंदू शस्त्रक्रिया, रक्तदान शिबिरे, पुण्यातील झोपडपट्ट्यांमधील मुलींच्या सक्षमीकरणाचे उपक्रम तसेच शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील सातत्यपूर्ण कार्य आम्ही करत आहोत."यावेळी त्यांनी क्लबच्या प्रवासाला बळ देणाऱ्या कॉर्पोरेट भागीदार, सहकार्य करणाऱ्या संस्था आणि व्यक्तींप्रती कृतज्ञताही व्यक्त केली.

या प्रसंगी केमेटॉल इंडिया, ड्युरोशॉक्स, सिरम इन्स्टिट्यूट, देसाई इलेक्ट्रॉनिक्स, आरएसबी फाउंडेशन, वेकफिल्ड, दर्शना इंडस्ट्रीज आदी सीएसआर भागीदारांचा त्यांच्या आर्थिक व सहकार्यात्मक पाठबळाबद्दल सन्मान करण्यात आला.

केईएम, जनसेवा, इनाली, यार्डी, निरामय या भागीदार संस्थांचाही रोटरी क्लब ऑफ पुणे डाउनटाउनच्या सेवाप्रकल्पांना दिलेल्या सहकार्याबद्दल गौरव करण्यात आला.

रोटरी डिस्ट्रिक्ट पुनाचे मोठे देणगीदार रोटेरियन अनिल व नीरू गोयल यांचा त्यांच्या उदार योगदानाबद्दल सन्मान करण्यात आला.तसेच आरएसबी समूहाचे श्री.आर.के.बेहेरा यांना भारताच्या राष्ट्रपतींकडून प्राप्त झालेल्या डॉक्टरेट पदवीबद्दल विशेष सन्मान देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोटेरियन आशिमा आगाशे यांनी कुशलतेने केले.कार्यक्रमाच्या आयोजनात रोटेरियन परवीन साडेकर आणि असिस्टंट गव्हर्नर डॉ. झिम्रा इस्राएल यांनी मोलाचे योगदान दिले.

रोटरी क्लब ऑफ पुना डाउनटाउनच्या ४० व्या वर्धापनदिन सोहळ्याने "स्वत:पेक्षा जास्त सेवा"(सर्व्हिस अबोव्ह सेल्फ) या ब्रीदवाक्याप्रती क्लबची निष्ठा अधोरेखित केली असून, समाजात सकारात्मक आणि अर्थपूर्ण बदल घडवून आणण्याचा संकल्प अधिक दृढ करण्यात आला. हा संस्मरणीय सोहळा भविष्याबद्दल आशावाद आणि कृतज्ञतेच्या भावनेने संपन्न झाला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पांडुरंग गोरे यांची तज्ञ संचालकपदी नियुक्ती

चाकण (दैनिक संध्या) : सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे यशस्वीपणे वाटचाल सुरू असलेल्या येथील चाकण नागरी सहकारी पतसंस्थेच्या तज्ञ संचालकपदी तत्कालीन चाकण ग्रामपंचायतीचे माजी सदस्य व शिवसेनेचे ज्येष्ठ कार्यकर्ते पांडुरंग धोंडीबा गोरे यांची नियुक्ती करण्यात आली. गोरे यांच्या नियुक्तीचे चाकण शहरात जोरदार स्वागत होत आहे. पांडुरंग गोरे यांना समाजसेवेची प्रचंड आवड असून चाकण येथील चक्रेश्वर देवस्थान ट्रस्टच्या कार्यकारी संचालक मंडळावर आजही ते जोमाने काम करत आहेत. त्यांची निवड झाल्याबद्दल चाकणच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, गटनेते नितीन गोरे, शिवसेनेचे विभाग प्रमुख शेखर पिंगळे, स्वामी कानपिळे, उद्योजक दत्ता गाडेकर, वैजनाथ मुगावकर आदींनी त्यांचे कौतुक केले.




### सारस अर्बनने ग्रामीण भागात अर्थिक लाभ पोहचवावा - संतोषनाना डोळस

राजगुरुनगर (दैनिक संध्या) : सहकार क्षेत्रातील बॅकांचा मुख्य उद्देश हा ग्राहकांकडून आर्थिक ठेवींच्या स्वरूपात पैसे जमा करून घेवून त्यावर व्याज मिळवून तेच पैसे इतरांना विविध वित्तीय सेवा कर्जासाठी पुरवणे त्यासाठी जास्तीत जास्त ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला मदत करणे हाच राहीलेला आहे त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांच्या विकासाला मदत होते म्हणून आगामी काळात सारस अर्बन को -ऑप क्रेडिट सोसायटी लिमिटेड या संस्थेने ग्रामीण भागातील जनतेला त्याचा लाभ पुरवावा असे मत रिपाइं श्रमिक ब्रिगेडचे पुणे जिल्हाध्यक्ष संतोषनाना डोळस यांनी मेळाव्यात व्यक्त केले राजगुरुनगर विस्तार कक्षाच्या वतिने येथील आनंदी आनंद मंगल कार्यालयात संस्थेच्या वतिने सभासद आनंद मेळावा आयोजित करण्यात आला होता त्यावेळी संस्थेचे हितचिंतक म्हणून डोळस बोलत होते यावेळी सारस अर्बन क्रेडिट संस्थेचे संचालक मंडळातील अध्यक्ष भालचंद्र कुलकर्णी, उपाध्यक्ष नितीन जरांडे संचालक गणेश धारप, उल्का मोकासदार, जितेंद्र चंपानेरकर, सुनिल रसाळ, अनिल कावळे, गिरीश भवाळकर, शरद दिक्षित,विजय नातू संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास फडके हे उपस्थित होते तसेच राजगुरुनगरचे माजी सरपंच प्रदीप कासवा,भाजपचे उपजिल्हाध्यक्ष गणेश सांडभोर, राम खेडकर,शरद लोहोट,सविता खेडकर यासह संस्थेचे अनेक सभासद आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते संस्थेचे उद्दिष्ट जामिनकी कर्ज योजना, गृहतारण कर्ज योजना,कुटुंब इच्छापूर्ती योजना,हायपोथिकेशन कर्ज योजना,सोनेतारण कर्ज योजना मुदत ठेव योजना,अल्पावधी मुदत ठेव योजना, दामदुप्पट ठेव योजना यांसह अनेक किफायतशीर योजनांच्या माहीती प्रसाराच्या तसेच अधिकाधिक कर्ज ठेवी गुंतवणुकीच्या उद्देशाने मेळाव्याचे आयोजन संस्थेच्या राजगुरुनगर विस्तार शाखेच्या वतीने करण्यात आले होते नवीन वर्षानिमित्ताने उपस्थितांना तिळगूळ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली यावेळी उपस्थितांचे सविता खेडकर यांनी आभार व्यक्त केले.

### आळंदीत सदगुरु अमृतनाथ स्वामी महाराज पुण्यतिथीनिमित्त कीर्तन महोत्सव

आळंदी (दैनिक संध्या) : भागवत धर्म प्रचारक श्री सदगुरु अमृतनाथ स्वामी महाराज यांच्या ५८ व्या पुण्यतिथीनिमित्त आळंदी देवाची येथे अखंड हरिनाम सप्ताह व कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. चाकण रोड येथील श्री सदगुरु अमृतनाथ स्वामी महाराज संस्थेच्या वतीने होणाऱ्या या सप्ताहात राज्यातील नामवंत कीर्तनकारांची उपस्थिती लाभणार असून संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे. या कीर्तन महोत्सवात उल्हास महाराज सूर्यवंशी, समाधान महाराज शर्मा, ज्ञानेश्वर माऊली कुऱ्हाडे, भावार्थ महाराज देखणे, प्रमोद महाराज जगताप, डॉ.जयवंत महाराज बोधले, श्रीमहंत पुरुषोत्तम पाटील, श्रीगुरु चैतन्यमहाराज देगलूरकर तसेच प्रभुराज महाराज पाटील यांची कीर्तनसेवा लाभणार आहे. सद्गुरु अमृतनाथ स्वामी महाराज यांच्या भागवत धर्मप्रचाराचा वारसा पुढे नेणारा हा महोत्सव भक्ती, नामस्मरण व अध्यात्मिक जागृतीचे केंद्र ठरणार आहे. या कीर्तन महोत्सवाचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन निमंत्रक आळंदी देवस्थानचे विश्वस्त श्रीमहंत पुरुषोत्तम महाराज पाटील यांनी केले आहे.



### आ. बापूसाहेब पठारे यांच्या मार्गदर्शनाखाली आढावा; विकासकामांना गती

वाघोली (दैनिक संध्या) : आमदार बापूसाहेब पठारे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका अधिकाऱ्यांसोबत लोहगावमध्ये पाहणी दौरा केला. लोहगाव-वाघोली रस्त्यावरील जगद्गुरु कॉलनी, योजनानगर भागातील ड्रेनेज, पाणी, रस्ता याबाबत पाहणी केली. उपस्थित नागरिक बांधवांनीही विविध समस्या मांडल्या. पाहणीनंतर अधिकाऱ्यांसमवेत महापालिकेच्या संपर्क कार्यालयात बैठक घेतली व समस्यांवर उपाययोजना करण्याच्या सूचना करत सध्या सुरू असलेल्या विविध विकासकामांचा कामांचा आढावा घेतला. याप्रसंगी नगरसेवक रामदास दाभाडे, अनिल सातव, डॉ. श्रेयस खांदवे, ऐश्वर्या पठारे,मलनिस्सारण विभागाचे मुख्य अभियंता जगदीश खानोरे, कार्यकारी अभियंता विशाल हरिभक्त, युवराज हांडे, कनिष्ठ अभियंता सिद्राम पाटील, पाणी पुरवठा विभागाचे कनिष्ठ अभियंता शुभम घाटकर, पथ विभागाचे कनिष्ठ अभियंता सुनील पोपळे, विभागीय आरोग्य निरीक्षक श्रीमती धनश्री जगदाळे, आरोग्य निरीक्षक गोपाळ नायडू, प्रीतम खांदवे, राजेंद्र खांदवे, दासआप्पा खांदवे तसेच नागरिक बांधव उपस्थित होते.

# कामगारांचे ‘भीक मागो’ आंदोलन

जेजुरी (दै. संध्या)



जेजुरी जवळील किर्लोस्कर कंपनीतील कंत्राटी कामगार आणि कंपनी व्यवस्थापन यांच्यातील वाद न मिटल्याने कामगारांचे आंदोलन सुरू आहे.रविवार दिनांक 18 रोजी कामगारांनी आपल्या मागण्यांची दाखल घ्यावी यासाठी जेजुरीच्या खंडोबा गडाच्या पायरी मार्गावर भीक मांगो आंदोलन करून लक्ष वेधून घेतले.

गेली एक महिन्यापासून किर्लोस्कर कंपनीतील कंत्राटी कामगार आपल्या मागण्यासाठी कंपनी विरोधात आंदोलन करीत आहे कामगारांना पगार न देणे, अपमानास्पद वागणूक देणे, बेकायदेशीररित्या कामावरून काढणे असे जुलमी अन्याय कपंनी व्यवस्थापनने केल्याने कामगारांनावर उपासमारीची वेळ आली असल्याचे कामगार नेते हनुमंत म्हस्के यांनी सांगितले.

**कंपनी–कामगार संघर्ष तीव्र**

कामगार–व्यवस्थापन संघर्ष टोकाला गेला असून कंपनीकडून सकारात्मक निर्णय न झाल्याने रविवारी अनेक कामगारांनी खंडोबा गडाच्या नदी चौक–महाद्वार पायरी मार्गांवर थेट ‘भीक मागो’ आंदोलन छेडले.

दर्शनासाठी आलेल्या भाविकांनीही आंदोलनस्थळी भीक टाकत कामगारांप्रती सहानुभूती व्यक्त केली.

राष्ट्रीय मजदूर संघाचे अध्यक्ष सुनील शिंदे व उपाध्यक्ष सिताराम चव्हाण यांच्या उपस्थितीत आंदोलन झाले.कामगारांना योग्य न्याय मिळे पर्यंत राष्ट्रीय मजदूर संघ कामगारांच्या पाठीशी आहे,

“सर्व अन्यायग्रस्त कामगारांना तात्काळ कामावर घ्या, जाचक अटी लादण्याचा जुलमी प्रयत्न थांबवा,” अशी ठाम मागणीही शिंदे यांनी केली आहे.

यापूर्वी कामगार नेते हनुमंत म्हस्के यांनी ‘कामावर घ्या अन्यथा भीक मागो आंदोलन’चा इशारा दिला होता. मात्र कंपनी व्यवस्थापनाने दुर्लक्ष केल्याने हे आंदोलन छेडण्यात आले. या वेळी कामगार नेते विजय खोमणे, तानाजी दगडे, दीपक जगताप यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले.

## ड्रग्जविरोधात धडक कारवाई ; २ कोटींहून अधिकचा मुद्देमाल जप्त

शिरूर (दै. संध्या)

शिरूर तालुक्यात अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्याला आळा घालण्यासाठी शिरूर पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण यांच्या संयुक्त पथकाने अत्यंत महत्त्वाची आणि धक्कादायक कारवाई केली आहे. बाबुरावनगर, शिरूर परिसरात एमडी (मेफेड्रॉन) या अमली पदार्थाची विक्री होणार असल्याची खात्रीशीर गुप्त माहिती मिळाल्यानंतर राबविण्यात आलेल्या छाप्यात तब्बल १ किलो ५२ ग्रॅम एमडी जप्त करण्यात आली आहे. या कारवाईत एकूण २ कोटी १० लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून शादाब रियाज शेख (वय ४१, रा. शिरूर) या आरोपीस अटक करण्यात आली आहे. दि १७ जानेवारी २०२६ रोजी रात्री शिरूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांविरोधात पेट्रोलिंग सुरू असताना स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय बातमीद्वारे ही माहिती समोर आली. सदर माहिती तात्काळ शिरूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांना कळविण्यात आली. त्यांनी ही बाब वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानुसार एनडीपीएस कायद्याच्या कलम ४२ अन्वये आवश्यक ती परवानगी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले (शिरूर उपविभाग) यांच्याकडून दूरध्वनीद्वारे घेण्यात आली. यानंतर छाप्यासाठी पंच, छायाचित्रकार, वजनकाटा व पंचनाम्यासाठी लागणारे साहित्य बोलावून घेण्यात आले. पंच म्हणून नितीन बाद्ध गरदाळे (वय २१) व रामदास गेरोबा अरदवाड (वय ३८) यांची उपस्थिती निश्चित करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक पंडित मांजरे, पोलीस हवा.निलेश शिंदे, जनार्दन शेळके, तुषार पंधारे, राजू मोमीन, संजय जाधव तसेच मुख्यालय पुणे येथील पोलीस कॉन्स्टेबल पोपट गायकवाड, शिरूर पोलीस ठाण्याचे पो. उप.नि. दिलीप पवार, अंबादास थोरे, सचिन भोई आदी अधिकारी व कर्मचारी पथकात सहभागी होते.

## आळंदीत प्रवाशांची दीड किलोमीटर पायपीट!

आळंदी (दै. संध्या)

तीर्थक्षेत्र आळंदी येथील पीएमपीएमएल बस स्थानकाचे पंधरा दिवसांपूर्वी विस्तारीकरण करून ते दोन वेगवेगळ्या ठिकाणी विभागण्यात आले आहे. या प्रक्रियेत पुणे विभागातून येणाऱ्या बसेस आळंदी देहू फाटा वाय जंक्शन येथील मोकळ्या जागेत हलवण्यात आल्या आहेत. मात्र, या नवीन ठिकाणी प्रवाशांसाठी कसल्याही प्रकारच्या निवाऱ्याची अथवा प्रकाशाची सोय करण्यात आलेली नाही. यामुळे हडपसर, शेवाळेवाडी, खराडी, कात्रज, स्वारगेट, पुणे स्टेशन आणि कोथरूड यांसारख्या विविध भागांतून येणाऱ्या प्रवाशांना मुख्य आळंदीत जाण्यासाठी दीड किलोमीटरपर्यंत पायपीट करावी लागत आहे.राज्य परिवहन महामंडळाच्या जागेत तात्पुरत्या स्वरूपात हे स्थानक सुरू करण्यात आले असून, येथे दिवसभरातून लाखो प्रवाशी प्रवास करतात. रात्रीच्या वेळी प्रवाशांची मोठी गैरसोय होत असून लूटमारीची भीतीही व्यक्त केली जात आहे. या संदर्भात आळंदीतील ज्येष्ठ पत्र लेखक मुकुंद दिंडाळ यांनी स्वारगेट डेपोकडे लेखी स्वरूपात तक्रार करत जुन्या पुलाजवळील बस स्थानकावर या बसेस उभ्या करण्याची मागणी केली होती. मात्र, प्रशासनाकडून त्यांना उडवाउडवीची उत्तरे मिळाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.पीएमपीएमएल प्रशासनाने पुणे विभागातील बसेस नवीन स्थानकाऐवजी आळंदीतील जुन्या बस स्थानकावर उभ्या कराव्यात आणि ज्या ठिकाणी प्रवाशांची संख्या मर्यादित आहे अशा पिंपरी-चिंचवडकडे जाणाऱ्या बसेस नवीन स्थानकात हलवाव्यात, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ : प्रोलॉग स्पर्धेने दाखवून दिली भव्यतेची चुणूक

### मंगळवारपासून सुरू होणाऱ्या स्पर्धेत ३५ देशांतील २८ संघांत विजेतेपदासाठी चुरस

पुणे (दै. संध्या)



बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेअंतर्गत आजच्या प्रोलॉग रेसने आयोजनातील भव्यता आणि जागतिक स्तरावरील दर्जा अधोरेखित केला. जगभरातील ३५ देशांतील २८ नामवंत संघांचे १६४ आंतरराष्ट्रीय सायकलपटू या स्पर्धेत सहभागी होत असून, सह्याद्रीच्या घाटरस्त्यांवरून सुमारे ४३७ किलोमीटरचा आव्हानात्मक प्रवास करत विजेतेपदासाठी प्रयत्न करणार आहेत. स्पर्धेचा उत्साहवर्धक पूर्वरंग असलेली ७.५ किलोमीटरची प्रोलॉग (टाइम ट्रायल) रेसला दुपारी १.३० वाजता सुरूवात झाली. शहरातील नामदार गोपाळ कृष्ण गोखले चौक येथे पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी पहिल्या स्पर्धकाला हिरवा झेंडा दाखवत अधिकृत सुरुवात केली. यावेळी, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, राज्य क्रीडा व युवक कल्याण आयुक्त श्रीमती शीतल तेली- उगले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्यासह मान्यवर अधिकारी उपस्थित होते. या प्रोलॉग रेसमध्ये स्पर्धकांनी वैयक्तिक स्वरूपात एकामागोमाग एक मिनिटाच्या अंतराने सुरुवात केली. ही मास स्टार्ट रेस नसून, प्रत्येक सायकलपटूची वैयक्तिक वेळ निर्णायक ठरणार आहे. पुणेकर नागरिकांनी शहरातील मध्यवर्ती रस्त्यांवरून जाणाऱ्या सायकलपटूंचे उत्साहात स्वागत केले. स्पर्धेच्या पुढील टप्प्यांमध्ये आशिया खंडातील ७८, युरोपमधील ६९, तर ओशनिया, अमेरिका आणि आफ्रिका खंडांतील सायकलपटू सहभाग घेत आहेत. भारताचा इंडियन डेव्हलपमेंट संघही या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाला असून, देशांतर्गत सायकलिंगसाठी ही स्पर्धा मैलाचा दगड ठरणार आहे. सुरक्षेच्यादृष्टीने स्पर्धा मार्गावर सुमारे १ हजार ५०० पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त होता. यामध्ये स्थानिक पोलीस, गुन्हे शाखा, विशेष शाखा, बॉम्ब नाशक पथक तसेच शीघ्र कृती दलाचा समावेश होता. वाहतूक व्यवस्थापनासाठी स्वतंत्र नियोजन करण्यात आले. आपत्कालीन वैद्यकीय सेवा, रुग्णवाहिका आणि तांत्रिक सहाय्य पथकेही सज्ज ठेवण्यात आली होती. मंगळवार २० जानेवारी ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत पार पडणारी बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ ही स्पर्धा पुणे व परिसराच्या क्रीडा, पर्यटन आणि जागतिक ओळखीला नवे परिमाण देणारी ठरणार आहे. आजचा प्रोलॉग हा या भव्य आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचा केवळ पूर्वरंग असून, पुढील दिवसांत सह्याद्रीच्या घाटरस्त्यांवर रंगणारी चुरस अधिक उत्कंठावर्धक ठरणार आहे.

## कृषिक प्रदर्शनास राज्यभरातून शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद

बारामती (दै. संध्या)

■ प्रदर्शनात शेतकऱ्यांसाठी तंत्रज्ञानाधारित शेती प्रात्यक्षिक व श्वान स्पर्धा/पारितोषिकांचे विशेष आकर्षण



आज दि. १९ जानेवारी २०२६ रोजी बारामती येथील ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कृषी प्रदर्शनाच्या तिसऱ्या दिवशी राज्याच्या विविध भागांतून शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. विशेषतः नांदेड,बीड, जालना,सोलापूर, अहिल्यानगर,सातारा, सांगली आदी जिल्ह्यांमधून आलेल्या शेतकऱ्यांनी प्रदर्शन स्थळी गर्दी केली होती. शेतीसाठी आवश्यक असलेल्या आधुनिक यंत्रसामुग्री व अवजारांकडे शेतकऱ्यांचा विशेष कल दिसून आला.यामध्ये फवारणी यंत्रे, आंतरमशागतीसाठी उपयुक्त यंत्रे,तसेच विविध प्रकारच्या सूक्ष्म सिंचन प्रणालींबाबत माहिती घेताना शेतकरी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. यासोबतच मधुमक्षिका पालन, मत्स्यपालन,तसेच कमी खर्चातील शेडनेटमधील भाजीपाला उत्पादन तंत्रज्ञान यांसारख्या विषयांवर शेतकऱ्यांनी तज्ज्ञांशी सखोल चर्चा करून उपयुक्त मार्गदर्शन घेतले.

या प्रदर्शनाचे आणखी एक विशेष आकर्षण म्हणजे पश्मी व कारवान या जातींच्या श्वानांची स्पर्धा होय.या स्पर्धेतील विजेत्यांना ट्रस्टचे विश्वस्त मा. श्री.रणजीत पवार, केव्हीके,बारामतीचे माजी विषय विशेषज्ञ डॉ.रतन जाधव त्सेह्क इतर मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.सदर श्वान स्पर्धेसाठी निवड समितीमध्ये डॉ. बी.एन. आंबोरे, डॉ. ए. व्ही. खानविलकर,डॉ. टी. सी. शेंडे (पशुवैद्यकीय महाविद्यालय,शिरवळ) तसेच श्री. तेजस कळमकर,पुणे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या स्पर्धेमध्ये ५१ विविध जातीच्या श्वान मालकांनी सहभाग घेतला.

## महापालिका विजयानंतर ‘हा’ मोठा नेता भाजपच्या वाटेवर

शिक्रापूर (दै. संध्या)

राज्यभर नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिका निवडणुकांचे निकाल जाहीर झाले असून पुणे आणि पिंपरी चिंचवड या दोन्ही महत्त्वाच्या महापालिकांवर भारतीय जनता पक्षाने एकहाती सत्ता मिळवली आहे. या विजयामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, त्यांचे मनोबल उंचावले आहे. विशेष म्हणजे, शिक्रापूर-सणसवाडी जिल्हा परिषद गटातील राष्ट्रवादी काँग्रेसचा एक मोठा नेता भाजपच्या वाटेवर असल्याची चर्चा आता रंगू लागली असून,

यामुळे आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत मोठे फेरबदल होण्याची चिन्हे दिसत आहेत. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीची रणधुमाळी नुकतीच सुरू झाली आहे. केंद्रात आणि राज्यात भारतीय जनता पक्षाची सत्ता असताना पुणे जिल्ह्यावर राष्ट्रवादीची पकड मानली जात होती. परंतु, महापालिका निवडणुकीच्या काळात राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांनी स्वतः पुणे जिल्ह्यात तळ ठोकला होता, तरीही पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये राष्ट्रवादीला पराभवाचा सामना करावा लागला. या निकालाने राजकीय चित्र पालटले असून आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी अनेक इतर पक्षांचे पदाधिकारी भाजपच्या तंबूत शिरण्यासाठी इच्छुक आहेत.

# दीड वर्षानंतर नागरिकांच्या सेवेत सार्वजनिक शौचालय

**नगरसेवक आकाश जाधव यांचा पुढाकार**

चाकण (दै. संध्या)

येथील प्रभाग क्रमांक आठ मधील चाकण पोलिस ठाण्यासमोर चाकण नगरपरिषदेच्या माध्यमातून सुमारे ५० लाख रुपये खर्चून उभारण्यात आलेले दुमजली सार्वजनिक सुलभ शौचालय तब्बल दीड वर्षापासून वापराअभावी बंद होते. मात्र येथील कार्यक्षम नगरसेवक आकाशभाऊ जाधव यांनी पुढाकार घेऊन नागरिकांच्या सेवेत हे सार्वजनिक शौचालय सुरू करावे, अशी मागणी करताच नगरपरिषद प्रशासनाने हे शौचालय तातडीने सुरू करून नागरिकांना होणारा मनस्ताप वाचविला आहे.

दुमजली सार्वजनिक शौचालयाचे काम पूर्ण होऊन जवळपास दीड वर्षांचा कालावधी लोटला होता तरीही हे शौचालय सुरू न झाल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. या प्रभागाचे नगरसेवक आकाश जाधव यांनी चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांची प्रत्यक्ष भेट घेऊन तातडीने हे शौचालय सुरू करण्याची ठाम मागणी केली. शहरातील वर्दळीच्या परिसरात असलेले हे शौचालय बंद असल्यामुळे नागरिक, व्यापारी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच पोलिस कर्मचारी यांना मोठ्या



गैरसोयीला सामोरे जावे लागत होते. लोकांच्या करातून उभारलेली सुविधा बंद ठेवणे योग्य नाही. तात्काळ आवश्यक कामकाज पूर्ण करून शौचालय सुरू करण्यात यावे, अशी स्पष्ट भूमिका आकाश जाधव यांनी मांडली होती. त्यांच्या या मागणीची दखल घेत चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांनी संबंधित विभागांना तातडीच्या सूचना देत आवश्यक तांत्रिक तपासणी, स्वच्छता व्यवस्था, पाणी व वीजपुरवठा यासह सर्व बाबी पूर्ण करून घेतल्या. अखेर हे सार्वजनिक सुलभ शौचालय नागरिकांसाठी खुले करण्यात आल्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. हे शौचालय सुरू झाल्यामुळे परिसरातील अस्वच्छता कमी होण्यास मदत होणार असून, महिलांसह सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. नागरिकांनी याबद्दल कार्यक्षम नगरसेवक आकाश जाधव व नगरपरिषद प्रशासनाला धन्यवाद दिले असून, भविष्यात अशा सुविधा वेळेत सुरू करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

> “खेडचे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या माध्यमातून चाकणच्या विकासाला गती देणार आहे. चाकणचा विकास हाच आमचा ध्यास राहणार असून विकास कामांसाठी आम्ही कधीच मागे हटणार नाही. प्रत्येक काम पारदर्शकपणे पार पाडण्यावर माझा भर राहील.”
>
> - आकाशभाऊ जाधव, नगरसेवक, चाकण.